# मेहता मराठी ग्रंथजगत

फेब्रुवारी, २०२३

पृष्ठे ६८ किंमत : रु.१५

वर्ष तेविसावे

अंक दुसरा




## तुझी माझी दृष्टादृष्ट

तुझी-माझी दृष्टादृष्ट झाली आंब्याच्या राईंत
तरूवरी कोकिळेच्या कण्ठीं फुललें संगीत
धुन्द सुगंधाच्या धारा ओतूं लागला मोहर
मत्त माझिया मनाला पडे जगाचा विसर!

तुझी-माझी दृष्टादृष्ट झाली नदीतीरावरी
आणि उठल्या जळांत स्निग्ध सुंदर लहरी
येतां झुळूक वाऱ्याची तृण गेलें आन्दोलून
झालें रोमांचित मीहि विसरलें देहभान!

तुझी-माझी दृष्टादृष्ट झाली देवाच्या राउळीं
हृदयींच्या गाभाऱ्यांत लाख ज्योत उजळली
पाषाणाच्या मूर्तीमध्यें स्फुरे चैतन्य आगळें
माझ्या मनोवीणेवरी गोड गीत झंकारलें!

तुझी-माझी दृष्टादृष्ट झाली पाणियासी जातां
आणि कटीवरचा हा घडा राहिलाच रिता
नकळत आला खालीं माथ्यावरचा पदर
फुलें उधळूं लागले भंवतींचे तरुवर!

तुझी-माझी दृष्टादृष्ट झाली पाऊसकाळांत
शतधाराच्या वर्षावीं होती धरणी नाहत
लवलवती बिजली झणीं बिलगे मेघाला
तुझ्या-माझ्या मीलनाचा तिनें देखिला सोहळा!

(शान्ता शेळके
यांच्या 'वर्षा' या काव्यसंग्रहातून)

# पुरस्कारासाठी आवाहन



‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत केली गेली.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

## ‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**२०,०००/-**



पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१. १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली पहिली साहित्यकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

२. १ ऑक्टोबर, २०२३ ते १ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत पुरस्कारासाठीचे अर्ज स्वीकारण्यात येतील.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. तरी इच्छुक साहित्यिकांनी आपले साहित्य मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पत्त्यावर पाठवावे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २०२३ ◆ वर्ष तेविसावे ◆ अंक दुसरा

**संपादक :**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक :**
शंकर सारडा

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


*– अनुक्रमणिका –*


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **एक एक पान घडताना...** | **१०** |
| **उपक्रम** | **१६** |
| **प्रकाशन** | **२०** |
| **पुरस्कार** | **२३** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| गाव तेथे देव | २४ |
| बर्लिन गंगेला मिळाले | ३८ |
| सेतुबंधन | ४२ |
| सुखाचा लपंडाव | ५४ |
| **अभिप्राय** | **६०** |
| **दिनविशेष** | **६२** |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

संपादकीय

## प्रेमाचे रंग हजार

*या जन्मावर या जगण्यावर शतदा 'प्रेम' करावे*

मंगेश पाडगांवकरांच्या या अजरामर गीतात 'प्रेम' हा शब्द त्यांनी व्यापक अर्थाने वापरला आहे.

फेब्रुवारी महिन्यातील व्हॅलेन्टाइन डेच्या निमित्ताने प्रेमभावनेची व्यापकता, या भावनेतील विविध छटा अधोरेखित कराव्यात असं वाटलं. अर्थातच आमच्या विविध पुस्तकांतून या छटा विखुरलेल्या आहेत.

वि.स.खांडेकर यांची 'पहिले प्रेम' ही कादंबरी पहिल्या प्रेमाचा पुरस्कार न करता त्यातील स्वप्नाळूपणाचा धोका अधोरेखित करते, 'अमृतवेल'मधील देवदत्त आणि नंदामधील स्नेहबंध चाकोरीबाहेरचा तरी उदात्त पातळीवरचा. या कादंबऱ्या प्रेमाचे वेगळे स्वरूप दाखवणाऱ्याच म्हणाव्या लागतील. एव्हरग्रीन लेखक रणजित देसाई यांच्या 'अभोगी' कादंबरीतूनही केशर आणि डॉ. कैलास यांच्यातील प्रेम तरलतेच्या एका वेगळ्या पातळीवर पोचलेलं दिसतं. तर 'बाबुलमोरा' या कथासंग्रहातील कथा कलावंतांचं कलेबद्दलचं प्रेम अधोरेखित करतात. डॉ. आनंद यादव यांच्या 'झोंबी' या आत्मचरित्रात्मक खंडातून त्यांची शिक्षणाबद्दलची ओढ पाहायला मिळते.



सुधा मूर्ती यांची 'पितृऋण' सारखी कादंबरी श्राद्धासारख्या कर्मकांडातून वडील आणि मुलातील श्रद्धेय नात्याची ओळख करून देते. 'वपुं'च्या 'तू भ्रमात आहासी वाया' या छोटेखानी कादंबरीतून सायरा ही कादंबरीची नायिका असफल प्रेमाच्या नकारात्मकतेतून यशस्वीपणे बाहेर पडताना दिसते. 'घर परतीच्या वाटेवरती' या अनुवादित पुस्तकातील,

कुटुंबापासून योगायोगाने दुरावलेला मुलगा तरुणपणी परदेशातून भारतात येतो. आपलं मूळ गाव, कुटुंब यांना शोधून काढतो. केवढी ही ओढ आपल्या मातीची आणि कुटुंबाची! शोभा चित्रे यांच्या 'पानगळीच्या आठवणी' या पुस्तकातून त्या अमेरिकेत राहत असतानाही भारतातील त्यांच्या कुटुंबाबद्दलचं त्यांचं प्रेम अनुभवायला मिळतं. 'परमवीरचक्र' हे पुस्तक अर्थातच सैनिकांच्या जाज्वल्य देशप्रेमाचं दर्शन घडविणारं. किरण बेदी यांच्या 'निर्भय प्रशासन' या पुस्तकातून प्रशासनाच्या माध्यमातून परत देशप्रेमाची अनुभूती मिळते.

'हाऊ स्टारबक्स सेव्ह्ड माय लाईफ' हे पुस्तक साफसफाई म्हणजे अगदी वॉशरूम धुण्यासारख्या कामावरही प्रेम करायला शिकवतं, शिवाय एका कॉफी शॉपमधील बॉस आणि कर्मचारी यांच्यातील नात्याचं हृद्य दर्शन घडवतं. वेंकट अय्यर यांच्या 'कार्पोरेटला रामराम, शेतीला सलाम' या आत्मकथनातून गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून शेतीची ओढ असलेल्या एका माणसाचं मातीविषयीचं, पर्यावरणाविषयीचं प्रेम पाहायला मिळतं. 'रुपेरी सिंधू' तून अनुभवायला मिळतं बॅडमिंटनविषयीचं उत्कट प्रेम.

'साद घालतो कालाहारी' हे पुस्तक म्हणजे निसर्ग आणि प्राण्यांबद्दलच्या प्रेमाची असीम गाथा. 'सागरी परिक्रमेचा पराक्रम' शिकवतं साहसावर प्रेम करायला. शहाजीराजे आणि शिवरायांचं स्वराज्यप्रेम प्रकर्षाने जाणवून देतो विश्वास पाटील लिखित 'महासम्राट' कादंबरीमालेतील पहिला खंड 'झंझावात.' मंजुश्री गोखले यांच्या संतचरित्रात्मक कादंबऱ्या विशिष्ट संतांची ईश्वरभक्ती तर अधोरेखित करतातच; पण त्यांचं समाजाविषयीचं प्रेमही दर्शवतात.

प्रेमाच्या विविध रूपांची ही पुस्तकरूपी झलक. अर्थातच पुस्तकांवर प्रेम केलं तरच हे सगळं अनुभवता येणार आहे. मुळात पुस्तक कोणतंही असो, अगदी वैचारिक, तत्त्वज्ञानात्मक असलं तरी प्रेरणा एकच असते - प्रेम. आपल्या मनातील भावना किंवा विचार दुसऱ्यापर्यंत पोचवण्यामागे साहित्यप्रकारपरत्वे दोनच गोष्टी प्रामुख्याने संभवतात. एक- 'या हृदयीचे त्या हृदयी पोचवणे' किंवा 'शहाणे करून सोडावे सकळजन.' या दोन्ही गोष्टी माणसाच्या माणसाविषयीच्या प्रेमाच्या द्योतक आहेत. नाही का?

अखिल मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

Find us on: facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

T BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक


**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अँन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazon kindle | Get it on Apple Books | Google Play Books

## नवी संहिता... नवा आशय...


**TBC-31 Book No. 6**

# द प्रॉडिगल डॉटर

**जेफ्री आर्चर**

अनुवाद

**डॉ. देवदत्त केतकर**




फ्लोरेंटिनानं लहानपणीचं पाहिलं राष्ट्राध्यक्ष होण्याचं स्वप्न... काँग्रेस सदस्यत्वापासूनचा तिचा राजकीय प्रवास राष्ट्राध्यक्ष पदाकडे सरकत असतो... पण राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक लढवत असतानाच तिला आमिषरूपी धमकी मिळते...दोन घराण्यांचं वैर, प्रेमाचा वसंत आणि राजकीय पटाच्या पार्श्वभूमीवर रंगलेली एका महत्त्वाकांक्षी स्त्रीची जबरदस्त कहाणी.

**किंमत : ७००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


**TBC-32 Book No. 1**

# द डे ऑफ द जॅकल

**फ्रेडरिक फोरसाइथ**

अनुवाद

**स्वाती देशपांडे**




जॅकल... तो बनतो कधी धर्मगुरू, तर कधी तृतीयपंथीय... वेगवेगळ्या नावांनी बनवतो पासपोर्ट... त्याचं मिशन आहे फ्रान्सच्या अध्यक्षांची हत्या... धूर्त जॅकल आणि प्रामाणिक पोलीस ऑफिसर लबेल यांच्यातील संघर्षाची थरारक, उत्कंठावर्धक कहाणी


**किंमत : ७५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

## नवी संहिता... नवा आशय...

TBC-32 Book No. 2

# सेल

**रॉबिन कुक**
अनुवाद
**डॉ. अजेय हर्डीकर**




आयडॉक या ॲपची निर्मिती... त्यामुळे ओढवलेला सहा रुग्णांचा मृत्यू... याबाबत एका रेडिऑलॉजिस्टने केलेल्या संघर्षाचं उत्कंठावर्धक चित्रण


**किंमत : ७००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

TBC-32 Book No. 3

# नथिंग व्हेंचर्ड

**जेफ्री आर्चर**

अनुवाद
**सविता दामले**




एका हरवलेल्या चित्राचा शोध घेता घेता अनेक रहस्यांची गुंफण अलगद सोडवणाऱ्या डिटेक्टिव्ह विल्यम वॉरिकची अनोखी शोधकथा...

**किंमत : ५८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# एक एक पान घडताना...



*– अनिल मेहता*

माझा पुस्तक व्यवसाय वृद्धिंगत होऊ शकला यासाठी माझ्या आयुष्यात मला जी जी माणसं भेटत गेली किंवा मला त्यांच्यापर्यंत पोचण्यात यश मिळालं, त्या सर्वांना मी त्याचं श्रेय देईन. त्यात माझ्यावर संस्कार करणारे माझे आई-वडील आहेत. मला साथ देणारी माझी पत्नी तसेच व्यवसायाचा पाया जरी मी घातला असला तरी त्यावर कळस चढवणारा माझा मुलगा आहे. मला मदत करणारे माझे भाऊ, सहकारी, माझ्याकडील सेवक वर्ग आहे आणि मला सल्ले देणारे माझे मित्र आहेत. मला मिळालेले लेखक, संपादक, चित्रकार मित्र, प्रकाशक मित्र, पत्रकार मित्र, निरनिराळे पुस्तक विक्रेते, त्यांचे प्रतिनिधी आहेत. असे खूप जण आहेत. सुरुवात करतो ती देवचंद शहा यांच्यापासून.

## देवचंद शहा



प्रत्येकाच्या आयुष्यात एक 'टर्निंग पॉइन्ट' येत असतो आणि त्यानंतर त्या व्यक्तीचं आयुष्य बदलून जात असतं. माझ्याही बाबतीत तसं घडलं. देवचंद शहा यांच्यामुळं मी कोल्हापुरात येऊन स्वतंत्र व्यवसाय सुरू करू शकलो.

निपाणीला नवीनच सुरू झालेल्या जनता कॉलेजला काही नवीन इंग्रजी पुस्तकं हवी होती.

मी पुण्यात कॉलेजमध्ये असताना माझ्या वडिलांकडं ती ऑर्डर आली. त्या पुस्तकांच्या यादीसोबत बँकेचा डी.डी. पण पाठवला होता. मी ही पुस्तकं मिळवण्यासाठी पुण्यातील काही नामवंत पुस्तक विक्रेत्यांकडं गेलो; पण प्रत्येकानं ही पुस्तकं दोन - चार दिवसांत मुंबईहून आणून देऊ, असं उत्तर दिलं. माझ्या मनात विचार आला, की 'आपणच का मुंबईला जायचं नाही?' आणि मी डेक्कन क्विननं मुंबईला निघालो. गाडी निघण्यापूर्वी अर्धा तास आधी पुणे स्टेशनवर पोहोचलो. त्याचवेळी श्री. देवचंद शहा यांचा ड्रायव्हर मला दिसला.

मी त्यांना विचारलं, ''बाबासाहेब, तुम्ही इकडं कसे?''

त्यांनी सांगितलं, ''शेटजी मुंबईला जात आहेत. फर्स्ट क्लासच्या कम्पार्टमेन्टमध्ये आहेत.''

श्री. देवचंद शहा जनता कॉलेजचे संस्थापक होते. निपाणीतले तंबाखू उद्योगातले मोठे उद्योगपती होते. तसेच त्यांचे इतरही अनेक व्यवसाय होते. मी विचार केला, आपण देवचंद शहा यांना भेटायला हवं. त्यांचा व माझा समोरासमोर असा कधी परिचय झालेला नव्हता; पण आपल्या गावातली ती एक मोठी व्यक्ती आहे. त्यांच्या कम्पार्टमेन्टजवळ जाऊन खिडकीतून मी त्यांना नमस्कार केला व माझी ओळख करून दिली.

ते म्हणाले, ''मी ओळखतो तुला. सांगण्याची आवश्यकता नाही. तू कुठं निघाला आहेस?''

मी म्हणालो, ''याच गाडीनं तुमच्या कॉलेजसाठी पुस्तकं घेण्यासाठी मुंबईला निघालोय.''

ते म्हणाले, ''अरे, मग तू माझ्यासोबतच चल. तुझ्याशी मला गप्पाही मारता येतील. तुझ्याजवळ काही सामान वगैरे आहे का? जा, ते घेऊन ये.''

माझ्याकडं फक्त एक पिशवीच होती. त्यांनी मला त्यांच्याजवळच बसवून घेतलं व टीसीकडून माझं तिकीट बदलून घेतलं.

प्रवासात त्यांनी मी काय करतो वगैरे माझी चौकशी केली. आमच्या छान गप्पा झाल्या. त्यावेळी ते इतके मोठे असूनही किती जमिनीवर आहेत, माणूस म्हणून खरोखरच किती प्रेमळ आहेत, याचा मला अनुभव आला. मुंबईला उतरल्यावरही त्यांनी मला त्यांच्यासाठी आलेली गाडी त्यांना त्यांच्या मुंबईच्या घरी सोडून घेऊन जाण्यास सांगितलं; पण मी नम्रपणे नकार दिला.

मी म्हटलं, ''काका, तुम्ही आज गाडी द्याल; पण पुन्हा मी ज्यावेळी येईन त्यावेळी मला स्वत:लाच सगळी सोय करावी लागेल.''

त्यावर ते म्हटले, ''ठीक आहे. काही अडचण आली तर मग लगेच फोन कर.''

मी त्यांना 'फोन करेन' असं म्हटलं. आणि पुस्तक खरेदीसाठी स्टेशन-बाहेर पडलो.

ही भेट मला माझ्या आयुष्यातील एका वेगळ्या वळणावर नेईल, असं मला त्यावेळी वाटलं नव्हतं. निघताना त्यांनी मला कॉलेजचं शिक्षण पूर्ण झाल्यावर निपाणीला येऊन भेटायला सांगितलं होतं.

कॉलेजचं शिक्षण पूर्ण करून मी निपाणीला आलो. त्यावेळी माझा लहान भाऊ प्रकाश आमच्या 'अजब स्टोअर्स' या दुकानाचं काम पाहत होता. मी त्याला मदत करू लागलो. वर्षभर मी दुकानात काम केलं; पण मला स्वत:चा काहीतरी नवा व्यवसाय सुरू करावा असं सतत वाटू लागलं. आणि एकदा मी सरळ श्री. देवचंद शहा यांना त्यांच्या घरी भेटायला गेलो. त्यावेळी मी पुढं काय करणार याची त्यांनी चौकशी केली. माझ्याकडं त्या प्रश्नाचं उत्तर नव्हतं; कारण निपाणी येथे मला करण्यासारखं काहीही नव्हतं. त्यांनी मला ''सातारा, सांगली, रत्नागिरी, कोल्हापूर या जिल्ह्यांची फिलिप्सची एजन्सी देतो,'' असं सांगितलं.

मी म्हटलं, ''हरकत नाही. विचार करून सांगतो.''

मी वडिलांशी चर्चा केली. तेव्हा हे काम आपल्याला अवघड जाईल असं माझ्या लक्षात आलं. मी श्री. देवचंद शहा यांच्याकडं पुन्हा गेलो व तसं सांगितलं. त्यांनी मला विचारलं,

''मग तुला काय करण्याची इच्छा आहे?''

''एखादं दुकान कोल्हापूरला मिळाल्यास तिथं मी पुस्तकांचं दुकान सुरू करू शकेन.'' मी मनातलं बोललो.

मी आठ दिवसांनी गेलो, तर त्यांनी मला कोल्हापुरातील एका दुकानाची जागा सुचवली. ही जागा मला व वडिलांना पसंत पडली; पण आमच्याकडं भांडवलासाठी पैसे नव्हते. निपाणीतलं आमचं भागिदारीमधलं दुकान नुकतंच तोट्यात गेलं होतं. त्यांनी मला विचारलं की ''किती लागतील?'' मी 'चाळीस हजार' सांगितले. त्यांनी मला वीस हजार रुपये दिले व दुसऱ्या

दिवशी कोल्हापूरमधील बँक ऑफ इंडियामधून वीस हजारांचं बँकेचं कर्ज मंजूर करून दिलं.

१९६५ साली त्या चाळीस हजारांच्या भांडवलावर मी गुढीपाडव्याला 'अजब पुस्तकालया'ची सुरुवात केली.

नंतरच्या काळात मी प्रकाशन व्यवसायही सुरू केला, तेव्हा मला भांडवल अपुरं पडू लागलं. हे देवचंद शहा यांच्या लक्षात आलं. त्यांनी मला बोलावून घेतलं व विचारलं ''मला समजलं की तू आर्थिक अडचणीत आहेस म्हणून?'' मी 'होय' म्हणालो, तर त्यांनी मला आणखी रक्कम दिली आणि म्हणाले,

''ही रक्कम परत करण्याची घाई करू नकोस. तुझ्याकडं ज्यावेळी पुरेसे पैसे असतील आणि परत करावेत असं वाटेल त्यावेळी परत कर.''

एखादी तरुण व्यक्ती वेगळं काही करू पाहते आहे, तर आपण त्या व्यक्तीला मदत केली पाहिजे ही त्यांची भावना असायची. केवळ मीच असं नव्हे, तर जी जी मुलं त्यांना चांगली, हुशार अशी वाटली, त्या-त्या सर्वांना त्यांनी कायम मदत केली. एखाद्याला आपला माणूस म्हटलं की त्यांनी त्याला मदत केलीच म्हणून समजा. आणि पैसे देताना परतफेडीची भाषाही त्यांच्याकडं नव्हती. ''तुम्हाला ज्यावेळी योग्य वाटेल त्यावेळी आणून द्या,'' एवढंच ते म्हणत. त्यांची मदत व त्यांच्या मनाचं हे मोठेपण यामुळं त्यांना मी माझा 'गॉड फादर' मानत होतो. रेल्वेमधील त्या तीन तासांच्या प्रवासात त्यांनी माझी काय परीक्षा घेतली माहीत नाही; पण त्यांनी त्यानंतर माझ्यावर जो विश्वास टाकला तो मी कधीही विसरू शकत नाही. मी तो सार्थ करून दाखवला.

मी दरवर्षी दिवाळीच्या पाडव्याला त्यांना नमस्कार करायला जात असे. त्यावेळी मी दुकानातील खरेदी-विक्रीचा ताळेबंद त्यांना सांगत असे. मध्यंतरी अजब पुस्तकालयाची पुढील सात फूट जागा रस्ता रुंदीकरणात गेली. माझ्यासमोर तेव्हा ते फार मोठं संकट उभं ठाकलं होतं. शेटजींना हे समजताच त्यांनी दुकानाच्या मागं असलेली जागा मिळवून दिली आणि नंतर दुकान मोठं व तीन मजली झालं. ते कायम माझ्या पाठीशी उभे राहिले.

१९९४ साली देवचंद शहा यांना देवाज्ञा झाली. मला पोरकं झाल्यासारखं वाटलं. त्यांनी मला दिलेल्या रकमेची नोंद कोठेही ठेवलेली नव्हती. सगळं बोलणं तोंडीच झालं होतं. देवचंद शहांनी दिलेल्या त्या रकमेबद्दल मी त्यांचा

मुलगा किरण यांना कल्पना दिली, की ''तुमचे एवढे एवढे पैसे माझ्याकडं आहेत.'' तर किरण यांनीसुद्धा, ''रक्कम परत करण्याची घाई करू नका. असू देत. मला लागले तर मी मागून घेईन.'' असं सांगून मला सांभाळून घेतलं. नंतर पाच-सहा वर्षं गेली. माझ्या व्यवसायाचा जम बसला. मग माझी पत्नी मला गप्प बसू देईना. 'पैसे परत करा' असा तिचा लकडा सुरू होता. एक दिवस किरण यांना फोन करून मी त्यांच्या बंगल्यावर गेलो व त्यांची रक्कम परत केली. रक्कम देताना त्यांना मी म्हणालो,

''मी आता तुमच्या ऋणातून मुक्त झालो.''

पण माझं मन स्वस्थ नव्हतं. मी किरण यांच्या पत्नी प्रतिभाभाभी यांना एक रुपया मागितला. त्यांनी कारण विचारलं. मी म्हटलं,

''देवचंद शहा यांनी माझ्यावर प्रचंड उपकार केलेले आहेत. त्यातून मी मुक्त होऊ इच्छित नाही. तुम्ही मला एक रुपयाचं कर्ज द्या. हे कर्ज माझ्या डोक्यावर कायमचं राहील. मरेपर्यंत.''

एक रुपया शोधताना त्यांच्याही डोळ्यांत पाणी आलं. एक रुपया त्यांना काही सापडत नव्हता. शेवटी त्यांनी तो त्यांच्या सेवकाकडून घेऊन मला दिला. तो एक रुपया मी घेतला. त्यांना मी म्हणालो,

''तुमच्या या रुपयामुळं मी कायम तुमच्या ऋणात राहीन. मला कधीही मस्ती येऊ नये म्हणून हे कर्ज माझ्यावर असेल.''

तो एक रुपया घेऊन मी बाहेर पडलो.


आजही ६ मे, त्यांच्या जयंतीला व १४ मार्च, त्यांच्या पुण्यतिथीला मी त्यांच्या बंगल्यात जाऊन त्यांच्या फोटोला न चुकता हार घालतो. मी जर तेव्हा कोल्हापुरात नसेन, तर माझ्या सहकाऱ्यांपैकी कोणीतरी जाऊन देवचंद शहा यांच्या फोटोला हार घालतो; पण कधीही या तारखा चुकवत नाही. आता देवचंद शहा यांचा नातू आशिष आणि त्यांच्या पत्नी तिथं असतात. त्यांनाही या दोन्ही तारखांना मी येणार हे ठाऊक असतं.

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# सापशिडी

## स्वाती चांदोरकर





जीवनाचे रंग हजार आणि सूक्ष्म
मनोव्यापार... 'सापशिडी'तून घडतो
कलात्मक आविष्कार

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# इश्क@मांडवी

## मिलिंद महांगडे




मांडवीच्या तरल प्रवाहाकाठी फुललेली
अलवार भावस्पर्शी प्रेमकहाणी...

**किंमत : २९०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# सातारा ग्रंथमहोत्सव २०२३

सातारा ग्रंथमहोत्सव समितीच्या वतीने १३ ते १६ जानेवारी दरम्यान आयोजित केला गेलेला 'सातारा ग्रंथ महोत्सव' येथील जिल्हा परिषदेच्या मैदानावर पार पडला. शंकर सारडा साहित्य नगरीमध्ये महाराष्ट्रभरातून आलेल्या प्रकाशक व पुस्तक वितरकांचे पुस्तकांचे स्टॉल लक्ष वेधून घेत होते. विविध साहित्यविषयक कार्यक्रमांचे आयोजनही या निमित्ताने करण्यात आले होते.

महेश कोठारे यांच्या 'डॅम इट आणि बरंच काही' या आत्मचरित्राचे लोकार्पण या ग्रंथमहोत्सवात करण्यात आले. यावेळेस महेश कोठारे, लेखक प्रताप गंगावणे, अभिनेते किरण माने, संतोष पाटील, अभिनेत्री माधुरी पवार व ग्रंथमहोत्सव समितीचे पदाधिकारी व कवी प्रदीप कांबळे, प्रकाशक अखिल मेहता उपस्थित होते. या प्रकाशन सोहळ्यानंतर महेश कोठारे यांची मुलाखत घेण्यात आली.

महेश कोठारे म्हणाले, ''कष्ट घेतल्याशिवाय यशाचा आनंद मिळवता येत नाही. बाल कलाकारांचं कौतुक होत असतं; पण मोठं झाल्यानंतर प्रचंड स्पर्धा उभी असते. तुम्ही वर्तमानात काय करू शकता यालाच इथे महत्त्व असतं. वीस टक्के नशीब असतं; पण ते मिळवण्यासाठी ऐंशी टक्के प्रयत्न करावे लागतात. सिनेमाक्षेत्र व्यापक आहे.'' संघर्ष करतच पहिला चित्रपट 'प्रीत माझी तुझी'





हा मिळाला, अशीही आठवण त्यांनी सांगितली.

पुस्तकनिर्मिती होत असतानाच्या कडू-गोड आठवणींनाही यावेळेस त्यांनी उजाळा दिला. पुस्तकाचं मुखपृष्ठ प्रथमदर्शनी आवडलं नव्हतं; मात्र प्रकाशक आपल्या मतावर ठाम राहिल्याने तेच मुखपृष्ठ कायम ठेवलं. पुस्तक बाजारात आल्यावर मात्र प्रकाशकांनी ठरवलेलंच मुखपृष्ठ उत्तम असल्याची खात्री पटली, अशी प्रांजळ कबुली देऊन त्यांनी स्वत:च्या मनमोकळ्या स्वभावाचं दर्शन घडवलं. तसेच चित्रपट व पात्रांच्या नावां-विषयीचं रहस्यही या मुलाखतीतून त्यांनी उलगडलं. त्यात तात्या विंचू हे नाव कसं सुचलं, पाच अक्षरी नावं चित्रपटांना का दिली हे सांगितलं. शिवाय 'ओम् फट स्वाहा' मंत्राची गंमत सांगून हशा पिकवला.

या मुलाखतीनंतर सातारकरांच्या वतीने महेश कोठारे यांना मानपत्र देण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या स्टॉललाही महेश कोठारे यांनी भेट दिली. तिथे उपस्थित चाहत्यांशी संवाद साधून पुस्तकावर स्वाक्षरीही दिली. यावेळेस मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक अखिल मेहता व साहिल मेहता उपस्थित होते.

## चेन्नई आंतरराष्ट्रीय ग्रंथमहोत्सव

तामिळनाडू राज्य सरकारने आयोजित केलेल्या चेन्नई आंतरराष्ट्रीय ग्रंथमहोत्सवामध्ये भारतातून तसेच जगभरातून आलेल्या प्रकाशक व पुस्तकप्रेमी यांची मांदियाळी अनुभवायला मिळाली. जवळपास ४७ वर्षे या महोत्सवाचे आयोजन केले जाते. या महोत्सवाच्या माध्यमातून भाषिक आदान-प्रदान व्हावे यासाठी तामिळनाडू सरकारमार्फत महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले. तामीळ भाषेतील साहित्य इतर प्रादेशिक वा परदेशी भाषांत अनुवादित स्वरूपात नेल्यास त्या अनुवाद



प्रकल्पासाठी निधीस्वरूपात साहाय्य करण्याची घोषणा मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केली. इतर भाषांतील साहित्यही अनुवादाच्या माध्यमातून तामीळ भाषेत पोहोचवण्यास आमच्याकडून सर्वतोपरी साहाय्य केले जाईल, असेही प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक अखिल मेहता व साहिल मेहता यांनी या ग्रंथमहोत्सवात सहभाग घेतला. परिसंवादात बोलताना अखिल मेहता यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसची कार्यपद्धती व व्यावसायिक बाजू याची माहिती दिली. अनुवादित पुस्तके व टी बुक क्लब यासंदर्भात माहिती देताना या दोन्ही गोष्टींचे श्रेय सुनील मेहता यांना जाते, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. प्रादेशिक भाषेतील अनुवादित असणाऱ्या साहित्याला चांगली मागणी असल्याचे आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले. रणजित देसाई यांच्या ‘श्रीमान योगी’ या कादंबरीलाही ई-बुक स्वरूपात चांगली मागणी असल्याचे व मेहता पब्लिशिंग हाऊस ही मराठीत ई-बुक स्वरूपात पुस्तके उपलब्ध करणारी मराठीतील पहिली प्रकाशनसंस्था असल्याचे त्यांनी नमूद केले. भारतभरातून आलेल्या अनेक ग्रंथविक्रेते व वितरक यांचे पुस्तकांचे स्टॉल्स व त्यांची आकर्षक अशी मांडणी यातून लोकांच्या मनात पुस्तकांबद्दल असलेले प्रेम सगळीकडे जाणवत होते. तामिळनाडू सरकारने तामीळ भाषा व भाषिक अस्मितेसाठी केलेल्या अशा प्रकारच्या आदर्शवत् व अनुकरणीय कामातून महाराष्ट्र शासनानेही बोध घ्यावा, असे वाटते.

◆



## सुनील मेहता स्मृतिदिन

१२ जानेवारीला सुनील सरांना आपल्यातून जाऊन एक वर्ष झालं. सरांचं आपल्यातून जाणं हे चटका लावणारं होतं. मागचं संपूर्ण वर्ष सरांची आठवण आली नाही असा एकही दिवस गेला नाही. याच आठवणी सोबत घेत मेहता पब्लिशिंग हाऊसच्या टीमने गेलं वर्षभर सरांनी आखून दिलेल्या मार्गावरच वाटचाल केली.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तक दालनात सरांच्या स्मृतींना उजाळा म्हणून एक अनौपचारिक कार्यक्रम आयोजित केला होता. त्यात सरांच्या सोबत काम केलेले संपादक, अनुवादक, प्रिंटर, लेखक आणि संस्थेचे कर्मचारी या सर्वांनी सरांच्या आठवणी उलगडत सरांच्या स्मृतीला अभिवादन केले. उमा कुलकर्णी, लीना सोहोनी, शुचिता फडके, संजीवनी शिंत्रे, प्रसन्न ओगले, दीपाली चौधरी, अमिताभ सावंत इत्यादींनी सुनील सरांच्या आठवणींना उजाळा दिला.

◆



प्र

का

श

न

## ‘निर्भय प्रशासन’ व ‘नेतृत्वनिर्मिती’

पुदुच्चेरीच्या माजी नायब राज्यपाल व माजी प्रशासकीय अधिकारी डॉ. किरण बेदी यांच्या ‘निर्भय प्रशासन’ व ‘नेतृत्वनिर्मिती’ या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा पुणे येथील पत्रकार भवनात पार पडला. अनुवादक सुप्रिया वकील, भारतीय महिला क्रिकेट संघाच्या माजी कर्णधार शुभांगी कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता आदी यावेळी उपस्थित होते.

‘‘नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीने तन-मन अर्पण करून इमानदारीने काम केलं तर प्रशासनात नक्कीच बदल घडतो,’’ असे प्रतिपादन डॉ. किरण बेदी यांनी यावेळी केले. ‘‘सुनील मेहता यांच्यामुळे माझी पुस्तकं मराठीत आली. आज त्यांची खूप आठवण येत आहे. माझी आजची दोन्ही पुस्तकं त्यांच्या स्मृतींना समर्पित करते,’’ अशी भावना डॉ. बेदी यांनी व्यक्त केली.

‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्काराची’ घोषणा यावेळी करण्यात आली. सुनील मेहता यांच्या स्मरणार्थ २०२४ पासून नवोदित लेखकांच्या कथासंग्रह व कादंबरी या साहित्य प्रकारातील प्रथम प्रकाशन असलेल्या साहित्यकृतींना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.



मी क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली त्या काळी मुलींच्या क्रिकेट खेळण्याबाबत साशंकता व्यक्त करण्यात येत होती. त्यावेळी किरण बेदी यांचे धाडसी काम आमच्यासाठी आदर्श आणि प्रेरणादायी ठरल्याचे शुभांगी कुलकर्णी यांनी सांगितले. सुप्रिया वकील यांनी अनुवादामागील भूमिका मांडली.




मृण्मयी भजक यांनी सूत्रसंचालन केले.

## ‘डॅम इट आणि बरंच काही’

दादर येथील शिवाजी मंदिर येथे ‘डॅम इट आणि बरंच काही’ या ज्येष्ठ अभिनेते महेश कोठारे यांच्या आत्मचरित्राचा प्रकाशन सोहळा नुकताच पार पडला. या प्रकाशन सोहळ्यासाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभली. ‘डॅम इट...’चं शब्दांकन करणारे मंदार जोशी, बँक ऑफ महाराष्ट्रचे आशिष पांडे व मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता या वेळी उपस्थित होते. मंदार जोशी यांनी शब्दांकन करत असताना आलेले अनुभव विशद केले, तर महेश कोठारे यांनी हे आत्मचरित्र म्हणजे जीवनात अनुभवलेला संघर्ष व यशापयशाचा आलेख असल्याचं सांगितलं.

अभिनेते महेश कोठारे हे वेगळ्या धाटणीचे चित्रपट देणारे अभिनेते, तसेच निर्माते व दिग्दर्शक म्हणून सर्वांना परिचित आहेतच. त्यांच्या या कारकिर्दीचा गौरव करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, ‘‘महेश कोठारे हे कधीच निवृत्त होऊ शकत नाहीत. त्यांनी आम्हा सर्व रसिकांना असेच वेगवेगळ्या धाटणीचे चित्रपट द्यावेत ही सदिच्छा!’’



'''डॅम इट आणि बरंच काही' या कोठारे सरांच्या आत्मचरित्राच्या निमित्ताने मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथसूचीमध्ये अग्रक्रमाने व अभिमानाने घ्यावं, असं नाव समाविष्ट झालं याचा आम्हाला आनंद वाटतो,'' असे उद्गार अखिल मेहता यांनी काढले. किरण शांताराम, रामदास पाध्ये आणि कुटुंबीय, सचिन पिळगांवकर, निवेदिता सराफ, जयवंत वाडकर या वेळी उपस्थित होते. या क्षणी चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांबरोबरच कोठारे कुटुंबीय व त्यांचा मित्रपरिवार उपस्थित होता. त्याचबरोबर अनेक कोठारेप्रेमी चित्रपट रसिकांची उपस्थितीही नजरेत भरण्यासारखी होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिनाथ कोठारे, ऊर्मिला कोठारे आणि रोहित हळदीकर यांनी केले.

डोंबिवली येथे पै यांच्या फ्रेंड्स लायब्ररीच्या वतीने पुस्तक आदान-प्रदान कार्यक्रमातही **'डॅम इट आणि बरंच काही'** या महेश कोठारे यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी फ्रेंड्स लायब्ररीचे पुंडलिक पै व मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक अखिल मेहता उपस्थित होते. पुस्तक आदान-प्रदान यांसारख्या उपक्रमाच्या माध्यमातून मराठी साहित्याला पूरक असे उपक्रम राबवत आहेत त्याबद्दल पुंडलिक पै आणि त्यांचे सहकारी यांचे अभिनंदन!

◆

## ‘पद्मभूषण’ पुरस्कार


काही व्यक्तिमत्त्वं अशी असतात की, ती त्यांच्या कार्यकर्तृत्वाने खूप मोठी असतात. त्यांना पुरस्कार मिळणं हे निमित्तमात्र असतं. या लोकांना पुरस्कार मिळाल्याने त्यांचा सन्मान न होता तो त्या पुरस्काराचाच एक प्रकारे सन्मान असतो. अशी दोन प्रतिभावान व्यक्तिमत्त्वं आमच्या समृद्ध ग्रंथसूचीत झळकताहेत व आम्हाला त्यांचा सार्थ अभिमान आहे.

साहित्याच्या क्षेत्रात अखिल भारतीय पातळीवर एक वेगळाच ठसा उमटवलेले डॉ. एस. एल. भैरप्पा. भैरप्पा यांचे साहित्य वाचकांच्या मनाला भावणारे व आजही बेस्ट सेलर या वर्गात आपले स्थान राखून ठेवणारे असेच आहे.

सुधा मूर्ती या आबालवृद्धांच्या लाडक्या लेखिका त्यांची २४ पुस्तके आम्ही प्रकाशित केली. लवकरच पंचविसावे पुस्तक मराठीत आणण्याचा आमचा मानस आहे. सुधाताईंचं साहित्य आजही लोकप्रिय व वाचकप्रिय असून, त्यांच्या अनेक आवृत्त्या मराठीत प्रकाशित झाल्या आहेत.


डॉ. भैरप्पा यांना साहित्य व शिक्षण क्षेत्रातील कार्य, तर सुधा मूर्ती यांना सामाजिक कार्यासाठी भारत सरकारतर्फे प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला ‘पद्मभूषण’ हा नागरी पुरस्कार जाहीर झाला. या पुरस्काराबद्दल मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे या दोन्ही दिग्गजांचं मन:पूर्वक अभिनंदन!







पुस्तकाच्या पानांतून




# गाव तेथे देव

**भा. द. खेर**

*दोन पिढ्यांतील अंतराचं दर्शन घडविणारी सामाजिक कादंबरी*

कोणतीही गोष्ट अकस्मात घडली म्हणजे माणूस गोंधळून जातो. नको असलेला पाहुणा अवचित आला की, माणूस असाच अचंबित होतो. त्या दिवशी तसंच झालं.

मे महिन्याचे सरते दिवस होते. आकाशात काही पांढरेशुभ्र मेघखंड रेंगाळत होते. त्यामुळे धरित्रीवर सावली पडली होती; पण मनस्वी उकाड्यामुळे जीव घुसमटत होता. घरात बसून राहणं शक्य नव्हतं. आंबेगावातील बरीच मंडळी बाहेरच्या मोकळ्या हवेत फिरायला बाहेर पडली होती आणि त्यांनी गावाजवळच्या टेकडीचा आश्रय घेतला होता. मे महिन्यात पाच वाजता सूर्य आकाशात चांगलाच तळपत असतो, पण त्या दिवशी आकाशात पांढरे ढग रेंगाळत असल्यामुळे



टेकडीवर उन्हाचा ताव फारसा जाणवत नव्हता.

घरात मनस्वी उकाडा होत असल्यामुळे बरीच मंडळी घरातून बाहेर पडून पश्चिमेकडील टेकडीकडे धाव घेत होती.

आंबेगावातील या टेकडीला गावकरी मंडळी महाबळेश्वर या नावानं संबोधत असत. गावातील काही लोक या टेकडीचा उल्लेख डोंगरावरील महाबळेश्वर असाही करीत असत. त्यावर गावातले एकमेव उपाध्याय त्र्यंबकराव पाठक हसून म्हणत, ''कुणी सत्यनारायण म्हणावं, कुणी सत्यविनायक म्हणावं त्याचप्रमाणे कुणी टेकडी म्हणावं, कुणी डोंगर म्हणावं, ते महाबळेश्वरसारखं थंड हवेचं ठिकाण मात्र नक्कीच आहे.''

ही टेकडी भली लांब-रुंद होती. या टेकडीला चारी बाजूंनी उतार होता. टेकडीकडे तोंड केलं म्हणजे डाव्या बाजूच्या उतारावर शंकराचं जुनंपुराणं देऊळ होतं. त्या देवळातील शंकराला 'पावता शंकर' असं म्हणत असत. जो नवसाला पावतो तो पावता शंकर अशी त्या देवाच्या नावाची उकल केली जात असे.

टेकडीवर गेलेल्या गावकऱ्यांच्या घोळक्यात जगन्नाथ पाठक आणि जान्हवी भोसले या दोघांचाही समावेश होता. त्या दोघांची ओळख असूनदेखील ते काहीशा अंतरावर स्थानापन्न झाले होते. पठाराच्या मागच्या बाजूला ओळीनं बरीच आंब्याची झाडं होती. त्या झाडांच्या छायेतही कित्येक गावकरी विसावले होते. त्यांचं जगन्नाथ किंवा जान्हवी यांच्याकडे मुळीच लक्ष नव्हतं. लक्ष असायचं कारणही नव्हतं. गाव मुळात मुळीच कुचाळखोर नव्हतं. त्यातून भिन्न जातीयांच्या जोड्या लावण्याची सवय त्यांना कधीच जडली नव्हती.

आपली जणू परस्परांशी मुळीच ओळखदेख नाही, अशा आविर्भावात जगन्नाथ आणि जान्हवी हे बरंच अंतर सोडून बसले होते. कुणीच कुणाकडे बघत नव्हतं.

बाथरूममध्ये लकेर सोडावी त्याप्रमाणे जगन्नाथानं समोर बघत अगदी अभावितपणानं लकेर सोडली, 'दोन ध्रुवांवर दोघे आपण... तू तिकडे अन् मी इकडे.'

ते ऐकून काही अंतरावर बसलेली जान्हवी खुदकन हसली; परंतु तिनं त्याच्याकडे वळून बघितलं नाही.

एवढ्यात गोविंदराव कुलकर्णी त्यांच्या अंगावरून जाताना म्हणाले,

''काय जगू, सुट्टी संपली का नाही?''

त्यांच्या या औपचारिक प्रश्नावर जगन्नाथनं उत्तर दिलं, ''आलीय, संपत! गोविंदकाका या की इथे बसायला.''

त्यावर त्याच्या शेजारी राहणारे गोविंदकाका म्हणाले, ''जाऊन येतो पावत्या शंकराला ! तिथली घंटा हलवून शंकराला जागं केलं म्हणजे बरं वाटतं.''

''या जाऊन!''

गोविंदराव झपाझप पावलं टाकीत शंकराच्या मंदिराकडे निघून गेले.

जगन्नाथ पूर्व दिशेकडे बघत बसला.

निसर्गाचं सारं दृश्य पार पालटून गेलं होतं.

निसर्ग किती लहरी असतो पाहा! काही काळापूर्वी आकाशात रेंगाळणारे पांढरेशुभ्र मेघखंड कोठल्या कोठे गडप झाले होते. आकाश निरभ्र बनलं होतं. उन्हाळ्यातील ऊन आसमंतात पुन्हा सांडायला लागलं होतं. त्या उन्हाचे चटके बसायला लागले होते.

जगन्नाथ तिथून उठण्याच्या विचारात होता. तो अजूनही समोरच बघत होता. त्याला अवचित भलतंच दृश्य दिसलं.

दबा धरून बसलेल्या शत्रुसैन्यानं एकदम डोकं वर काढावं त्याप्रमाणे काळभिन्न मेघ पूर्वाक्षितिजावरून भराभर धावत येत होते. एखादं गजसैन्य चढाईसाठी निघाल्याचा भास होत होता. बघता बघता ते सैन्य आकाशाच्या माथ्यावर आलं आणि त्यानं शरवृष्टी सुरू केली. सारा आसमंत ओलाचिंब करून टाकला. क्षणार्धात दाणादाण उडाली.

टेकडीवरच्या लोकांना काय करावं तेच सुचेना. पळापळ सुरू झाली. कुणी आम्रवृक्षांच्या आश्रयाला गेले. कुणी शंकराच्या देवळाकडे धाव घेतली. जगन्नाथ आणि जान्हवी या दोघांनीही एका आम्रवृक्षाचा आश्रय घेतला. अगदी अभावितपणानं शेजारी उभ्या राहिलेल्या त्या दोघांकडे बघून कुणालाही कसला संशय येण्याचं कारण नव्हतं. आंबेगावात कुणाचीच दृष्टी कुत्सित नव्हती किंवा कुणाचीच संशयित वृत्ती नव्हती. सारं गाव सरळपणानं वागणारं होतं.

कुणाच्या मनात काही संशयास्पद असं आलं नाही तरी, जगन्नाथ आणि जान्हवी या दोघांचं मन त्यांना खात होतं. खाई त्याला खवखवे म्हणतात ते खोटं नव्हतं. चोराच्या मनात चांदणं असतं, हीच गोष्ट खरी!

वादळी पर्जन्यवृष्टी जशी अचानक सुरू झाली, तसे लोक भराभर पांगले. पूर्वक्षितिजाच्या मागून मेघांचं सैन्य ज्या वेगानं आलं, त्याच वेगानं ते पश्चिम क्षितिजाच्या आड नाहीसं झालं. हा सारा खेळ फार तर अर्ध्या तासाचा झाला असेल; परंतु त्या अवधीत सारा परिसर ओलाचिंब झाला. सर्वत्र पाणीच पाणी झालं.

पाऊस पुरता थांबला नव्हता, पण एवढ्यात बहुतेक सारी मंडळी उताराला लागून धावपळीनं गावात गेली.

जगन्नाथही जायला निघाला, तेव्हा जान्हवी त्याला म्हणाली, ''आता तर इथे थांबण्यात खरी मजा आहे.''

''ती मजा सजा देऊन जाईल तेव्हा कळेल!''

''प्रेमातील सजा हवीहवीशी वाटते नाही का?''

तो काही बोलणार एवढ्यात जान्हवी ओरडली, ''अरे, ते पहा इंद्रधनुष्य! भलीमोठी सप्तरंगी कमान समोर उभी राहिली आहे बघ!''

जगन्नाथनं तिच्या ओठांवर दोन उभी बोटं टेकून म्हटलं, ''श्यू! इंद्रधनुष्याबद्दल असं कुणाला सांगायचं नसतं!''

''काय होतं सांगितलं तर?''

''एखादं संकट ओढवतं.''

''कसलं संकट येणार आहे आपल्यावर?''

''आपल्या प्रेमावरही संकट येईल!''

''अरे जगा, प्रेमावर संकट आलं म्हणजे प्रेम तावूनसुलाखून निघतं.''

''जानू, ते संकट प्रत्यक्षात येऊन ठेपेल तेव्हा खरी परीक्षा होईल!''

त्याचं हे बोलणं चालू असताना ते इंद्रधनुष्य आकाशाच्या पाठीवरून पुसून गेलं होतं.

जान्हवी तारस्वरात म्हणाली, ''ते बघ, आपल्या प्रेमावरचं संकट नाहीसं झालं आहे.''

जगन्नाथ हसला आणि तिच्याजवळ सरकला.

खरोखर त्यांच्या प्रेमात झपाट्यानं केवढी प्रगती झाली होती. जगन्नाथचा जगा झाला होता आणि जान्हवीची जानू बनली होती. दोघांमधील अंतर कमी झालं होतं आणि प्रेमाचे पाश आवळले गेले होते. जान्हवी त्याच्या कानाशी कुजबुजत म्हणाली, ''जगा, हा पाऊस खरोखर केवढा जादूगर असतो! हिंदी

गाण्यातील किंवा ऊर्दू गझलांतील नायिका आक्रंदत म्हणते की, माझा प्रिय सखा नदीपार किंवा सागरापार गेलेला आहे आणि पाऊस हा दावेदाराप्रमाणे सतत कोसळतो आहे. कसा येणार तो प्रियकर माझ्या भेटीला? सारी रात्र उलटून गेली तरी माझ्या डोळ्याला डोळा लागला नाही. विरहाकुल यातना मला सहन होईनाशा झाल्या आहेत. मीलनाच्या नुसत्या कल्पनेनं सारं शरीर नुसतं फुलून गेलं आहे!''

जगन्नाथ म्हणाला, ''तुझ्या या बोलण्यानं माझ्याही अंगावर शृंगाराचे रोमांच फुलले आहेत. या वेळी मला कोणतं गाणं आठवतं सांगू?''

''सांग. हवं ते सांग आता इथे!''

''मला 'मृच्छकटिक' या नाटकातलं ते गाणं आठवतंय. 'तेच पुरुष दैवाचे.. अंगे भिजली जलधारांनी...''

''त्या वेळी काय केलं चारुदत्तानं?''

तिच्याकडे प्रेमानं कटाक्ष टाकीत जगन्नाथ म्हणाला, ''त्या भिजलेल्या अवस्थेत चारुदत्तानं वसंतसेनेला अगदी जवळ घेतलं.''

जान्हवी त्याच्याकडे तसाच प्रेमकटाक्ष टाकून म्हणाली, ''माझंही अंग या जलधारांनी भिजलेलं आहे. तेव्हा...''

''खुशाल भिजू दे, पण इथे मी चारुदत्त होणार नाही... तू वसंतसेना झाली असलीस तरी!''

''तुला आठवतं ते गीत? मला वाटतं सुधीर मोघे यांचं गीत असावं ते! 'गुज ओठांनी ओठांना सांगायचं... एका पावसात दोघांनी भिजायचं...''

जगन्नाथ एकदम म्हणाला, ''आपण दोघे एका पावसात भिजलो आहोतच की! आणि पहिली गोष्ट इथे नाही करता येणार! पुण्याच्या फर्ग्युसन टेकडीच्या मागे एकान्तात आपलं गुज ओठांनी ओठांना सांगितलं आहेच की!''

दोघांनाही तो प्रेमप्रसंग आठवला.

एकाच आंबेगावात ते लहानाचे मोठे झाले. एकत्र वाढले. एकत्र खेळले. एकाच विद्यालयात त्यांचं माध्यमिक शिक्षण झालं; परंतु तिथे प्रेमाचा धागा निर्माण होणं शक्यच नव्हतं. कारण त्या मागासलेल्या गावात जातीच्या भिंती बळकटपणानं उभ्या होत्या. जगन्नाथ पाठक हा ब्राह्मणाच्या भिंतीमागे दडलेला होता, तर जान्हवी मराठ्यांच्या भिंतीमागे लपलेली होती. आंबेगावातील हा जातीच्या लपंडावाचा खेळ कधीच संपणार नव्हता. तो खेळ संपेल किंवा

संपावा असं कुणाला कधी स्वप्नातही वाटलं नव्हतं.

परंतु ते दोघे पुण्याला एकाच कॉलेज्मध्ये गेले, तेव्हा हळूहळू त्यांच्यातील जातीय भिंत कोसळली. निसर्ग जागा झाला. प्रेमाच्या सुरवंटाचा जन्म झाला आणि त्यातून प्रेमाचं फुलपाखरू केव्हा बाहेर पडलं, ते त्या दोघांनाही कळलं नाही. फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीवर फिरताना ते केव्हा प्रेमबद्ध झाले, हे दोघांनाही कधी समजलं नाही.

त्या दोघांना एक गोष्ट मात्र पक्की आठवत होती, ती म्हणजे फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीवरील गोखले स्मारकाजवळ त्यांनी घेतलेल्या प्रेमाच्या आणाभाका!

तत्पूर्वी ते दोघे जण त्या टेकडीच्या मागच्या बाजूला नेहमीच्या एकान्त जागी स्थानापन्न झाले होते. असेच खेटून बसले होते. त्यांनी आपलं गुज परस्परांच्या ओठांना पुनःपुन्हा सांगितलं होतं. काही काळ विश्राम घेतल्यानंतर जगन्नाथ तिचा हात आपल्या हातात घेऊन म्हणाला होता, ''जानू मला अजूनही भीती वाटते गं!''

''कसली?''

''आपलं हे प्रेम किती तडीस जाईल त्याची!''

''मी तुझ्यासारखी डरपोक नाही. हां, पपा जर आता असते ना, तर मी या प्रेमात पडलेच नसते. त्यांना आपल्या खानदानाचा केवढा अभिमान! ब्राह्मणांकडे ते बघायचे ते केवळ राजपुरोहित म्हणून. स्वतः आपण राजघराण्यातले आहोत असं मानायचे ते. राजपुरोहितांना ते फक्त मान द्यायचे. ते गेल्यापासून त्यांचा ताठरपणा मी घेतलेला आहे. ममा माझ्याबाहेर जाणार नाही. माझे दोन भाऊ गेले. पपा गेले. तिला आता माझ्याशिवाय कोण आहे! मी म्हणेन ती आता पूर्व दिशा.''

काही वेळ थांबून ती पुढे म्हणाली होती, ''जगा, तू मात्र आता पड खाऊ नकोस!''

''जानू, त्यासाठी मला माझं मन फार घट्ट करावं लागेल. माझे बाबा या आपल्या प्रेमाला कशी काय संमती देतील कुणास ठाऊक ! त्याहीपेक्षा माझे थोरले काका! माझी आई माझा जन्म होताच देवाघरी निघून गेली. माझे बाबा, काका-काकी या सर्वांनी मला तळहाताच्या फोडासारखं वाढवलं, वागवलं. तेव्हा...''

''अजून तू तळहाताच्या फोडासारखाच आहेस का? तसा असशील तर तसाच राहणार आहेस का? नाहीतर उगाच या प्रेमाच्या फंदात पडलास, असं मी म्हणेन!''

''उगाच नाही पडलो या फंदात. तू मला या प्रेमात जखडून टाकलं आहेस. पण तू अजून विचार कर. मी एका भिक्षुकाचा मुलगा! तू खानदानी धनाढ्य घराण्यातील लाडकी मुलगी, कसं जमायचं हे?''

''जगा, प्रेम हे धनाढ्यापेक्षाही बलाढ्य असतं. तू पुढल्या गोष्टींची काळजी करू नकोस.''

''तुझ्यावर माझा सारा भार आहे.''

यावर जान्हवीनं आपलं तोंड त्याच्याकडे वर करून म्हटलं होतं, ''तुझा सारा भार माझ्यावर आहे ही गोष्ट मी पहिल्यापासूनच ओळखून आहे. त्याशिवाय तुझ्याशी हे प्रेमाचं हितगुज केलंच नसतं.''

त्या दोघांनी पुन्हा एकदा परस्परांच्या ओठांशी हितगुज केलं.

त्या दिवशी असाच अंधार पडला होता. त्या अंधाऱ्या रात्री चांदण्यांची चमचम सुरू झाली होती.

तिथून उठताना जान्हवी म्हणाली होती, ''तू आता माझ्यावर सारा भार टाकला आहेस ना ! चल उठ... त्या गोखल्यांच्या स्मारकासमोर जाऊन आपण प्रेमाची शपथ घेऊ. गोपाळ कृष्ण गोखले यांनी तिथे देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीची शपथ घेतली. आपण प्रेमाच्या स्वातंत्र्याची शपथ घेऊ. चल...''

एखाद्या मंत्रमुग्ध माणसाप्रमाणे जगन्नाथ उठला आणि जान्हवीच्या पाठोपाठ चालू लागला.

गोखले स्मारकासमोर उभं राहून त्यांनी प्रेमाचा मंत्र म्हटला होता. त्या स्मारकासमोर उभं राहून जान्हवीनं त्याला हात जोडायला सांगितले होते. त्यानं हात जोडल्यावर तिनंही हात जोडून म्हणायला प्रारंभ केला होता, 'आमचं हे प्रेम चिरंतन होवो ! कुणाची दृष्ट लागून आमचं हे प्रेम नष्ट न होवो ! आमचा पावता शंकर आमचं प्रेम पावन करू दे!''

त्या दोघांनी याप्रमाणे प्रेमाची शपथ घेतल्यानंतर आताप्रमाणे धरित्री अंधारात लपेटली होती. फरक एवढाच होता की, फर्ग्युसन टेकडी विद्युतदीपांमुळे उजळून निघाली होती. आंबेगावच्या या टेकडीवर चांदण्यांचा अधूक प्रकाश पडला होता. पर्जन्यवृष्टी थांबल्यानतर काही वेळातच त्या ठिकाणी सामसूम

झाली होती. त्या प्रेमी युगुलाला अचानक एकान्त मिळाला होता. त्यांचं प्रेमाचं हितगुज रंगलं होतं.

टेकडीच्या उतारावर घसरडं झालं होतं. टेकडी उतरताना जान्हवी त्याला म्हणाली, ''जगा, असा दुरून चालू नकोस. माझा हात धर... मी घसरले तर मला सावर...''

''कुणीतरी बघेल ना!''

''बघू दे... अगदी खुशाल बघू दे... खरं प्रेम निर्भय असतं.''

परस्परांचा हात धरून ते टेकडी उतरायला लागले. उतरताना ती एका ठिकाणी खरोखरच घसरली, तेव्हा त्यानं तिला अक्षरशः उचलून घेतलं. तेव्हा ती त्याला अभावितपणानं म्हणाली, ''आमच्या जातीत नवरदेव नवरीला असाच उचलून कडेवर घेतो.''

तोही हसून म्हणाला, ''तुला जर मी कडेवर घेतलं तर या चिखलात मला खरंच लोळायची पाळी येईल!''

''नाही येणार तशी पाळी! कारण मी आता तुझ्या जातीत प्रवेश करणार आहे! तुमच्याकडे आमच्यासारखी नवरीला कडेवर घेण्याची पद्धत थोडीच आहे? ...तुमच्याकडली विडा तोडण्याची पद्धत मात्र मला फार आवडते हं! विशेषत लवंगेची विडा तोडण्याची पद्धत! काय रे जगा, ही तुमची पद्धत ओठांनी ओठांना हितगुज सांगण्यासारखीच नाही का रे?''

जगन्नाथ तत्परतेनं म्हणाला, ''अगं, ती लवंगा तोडण्याची पद्धत जुनी झाली. पूर्वी प्रेमविवाह कुठे होत असत! तेव्हा त्या जुन्या पद्धती गेल्या. आता प्रेमविवाहाची नवी पद्धत आणि ओठांनी ओठांना हितगुज सांगण्याचीही नवी पद्धत''

टेकडीचा उतार संपत आला, तेव्हा ते दुरून चालायला लागले. जणू आपण त्या गावाचे नव्हेत, असा आविर्भाव त्यानी आणला होता खरा; परंतु लगट करून चालण्याची त्यांची दृश्यं गावातल्या लोकांनी केव्हाच टिपली होती.

खाली उतरल्यानंतर दूरदर्शनच्या कॅमेऱ्यानं आपली दृश्यं केव्हाच टिपलेली आहेत या गोष्टीची स्पष्ट जाणीव त्यांना झाली. पण आता काहीच इलाज नव्हता.

खाली उतरल्यानंतर जान्हवी डावीकडे घरी जायला निघाली. जगन्नाथानं

उजवीकडचा रस्ता धरला.

जान्हवीच्या घराच्या दिंडी दरवाजासमोरच्या मारुतीच्या पारावर एक टोळकं बसलं होतं. त्या टोळक्यानं जान्हवीकडे बघून न बघितल्यासारखं केलं; पण त्यांच्या नजरेतला तो भाव जान्हवीला समजला. जगन्नाथाच्या घराशेजारचे गोविंदकाका त्याला बघून त्याच्याशी न बोलताच घरात निघून गेले.

जान्हवीची आई पुतळाराणी तिला काहीच बोलली नाही; कारण तिला काहीच माहीत नव्हतं. जगन्नाथाची सरस्वतीकाकू त्यालाही काही बोलली नाही; कारण तिला माहीत असूनही बोलायचं नव्हतं. जगन्नाथाचे त्र्यंबककाका कुणाकडे तरी सत्यनारायणाची पूजा सांगायला गेले होते. ते उशिरानं घरी आले आणि जेवण करून झोपले. त्यामुळे त्यांच्याही बोलण्याचा प्रश्न आला नाही.

जेवताना सरस्वतीकाकू हळूच म्हणाल्या, ''कळलं का?''

त्र्यंबकाकानी खालच्या स्वरात उत्तर दिलं, ''कळलं, पण कुठाय तो?''

''जगू ना ! खोलीत जायची तयारी करीत बसला आहे.''

''कुठे जायची तयारी?''

''पुण्याला...''

''कॉलेज सुरू व्हायला अजून आठवड्याचा अवधी आहे आणि आताच पुण्याला चाललाय!''

''होय.''

एवढ्यात जगन्नाथ तिथे आला. ''का रे, एवढ्यात पुण्याला जायला निघालास! अजून आठवडाभर सुट्टी आहे ना?''

काकांच्या या प्रश्नावर जगन्नाथ सहजपणानं म्हणाला, ''अजून सुट्टी आहे; परंतु बी. कॉम.चं हे शेवटचं वर्ष. लवकर गेलं म्हणजे वसतिगृहात मनासारखी खोली मिळेल. शेवटच्या वर्षी त्या खोलीत चांगला अभ्यास करता येईल. उशिरा गेलो तर मनासारखी खोली मिळणार नाही आणि मग मनासारखा अभ्यास होणार नाही!''

यावर काका काहीच बोलणं शक्य नव्हतं. एवढंच म्हणाले, ''सकाळच्याच गाडीनं जाणार ना?''

जगन्नाथनं मान हलवली.

काकांनी सहज प्रश्न केला, ''अरे, ती जान्हवी तुमच्या कॉलेजात आहे

ना?''

त्यानं पुन्हा मान हलवली.

काकांनी विचारलं, ''ती उद्याच पुण्याला जाणार आहे का तुझ्याबरोबर?''

''कुणास ठाऊक! ती वसतिगृहात राहत नाही, तेव्हा तिला चांगल्या खोलीचा प्रश्न नाही. ती राहते तिच्या आईच्या आईच्या बंगल्यात, म्हणजे आजीच्या बंगल्यात!''

''कुठे आहे तो बंगला?''

''कॉलेजजवळ असावा. मला नेमकं माहीत नाही!''

जगन्नाथ हे अगदी चक्क खोटं बोलला. प्रेम जर पहिलं काय करीत असेल, तर तरुणांना ते खोटं बोलायला शिकवतं. जगन्नाथचं तेच झालं होतं. जान्हवीच्या आजीचा शाही बंगला त्याला चांगलाच माहीत होता. त्यांचं प्रेम जमल्यावर त्याचं तिथे नेहमी जाणं-येणं असे. त्या बंगल्याच्या एकान्तात त्या दोघांचं प्रेम चांगलंच फुललं होतं. त्यांच्या प्रेमाला गरुडाचे पंख फुटले होते. जान्हवीची आजी त्या बंगल्यात एकटी असल्यामुळे त्या बंगल्याच्या विशाल आकाशात त्यांच्या प्रेमाची गरुडभरारी उंचावली होती. त्या बंगल्यात त्यांचा मुक्त संचार चालला होता; कारण जान्हवीच्या आजीचं त्यांच्या प्रेमाला भरघोस प्रोत्साहन लाभलं होतं. त्यामुळे त्यांच्या प्रेमरूपी पंखांना चांगलंच बळ लाभलं होतं.

ही वस्तुस्थिती असताना जगन्नाथ काकांच्या प्रश्नावर खुशाल खोटं बोलला, ''तो बंगला कुठे आहे ते मला नेमकं माहीत नाही.''

झोपायला जाताना काका एवढंच म्हणाले, ''गोरक्षमताप्रमाणे उद्याचा दिवस चांगला नाही. मी आताच पंचांग बघितलं. तेव्हा प्रस्थान ठेवायला हवं!''

ते ऐकून सरस्वतीकाकूंनी लगेच एक फडकं घेतलं. हळदीनं ते पिवळं केलं. त्या छोट्या फडक्यात थोडे तांदूळ, हळकुंड आणि एक पैसा बांधला आणि ती प्रस्थानाची पुरचुंडी जगन्नाथाच्या हातात दिली.

काका त्याच्याकडे पाहून म्हणाले, ''हात-पाय धुऊन हे प्रस्थान देवासमोर ठेव. पुण्याला जाताना ते आठवणीनं बरोबर घे आणि पुण्याला गेल्यावर त्याचं विसर्जन कर... आणि हो, उद्या सकाळी मला सत्यनारायणाच्या पूजेला जायचंय. मी तुला पोचवायला स्टॅण्डवर येऊ शकणार नाही. जाशील ना एकटा?''

मान हलवून जगन्नाथ हसून म्हणाला, ''मी आता लहान आहे का काका? एकटा न जायला काय झालं?''

सारी मंडळी झोपायला निघून गेली.

काका अंथरुणावर अंग टाकणार तोच सरस्वतीकाकू हळूच म्हणाल्या, ''सारा प्रकार आपल्याला कळलाच आहे. आपण भाऊजींना पत्र टाकून बोलावून घ्यावं. एकट्याला हे सारं निपटता येणार नाही''

''मी सारा विचार केलाय. उद्या सकाळी शंकराची पूजाअर्चा केल्यानंतर मी बापूला पत्र लिहिणारच आहे. सत्यनारायणाच्या पूजेला बारा वाजता जायचं आहे. तोपर्यंत खूप वेळ आहे.''

भल्यापहाटे जगन्नाथ उठला आणि जायच्या तयारीला लागला. काकूंनी त्याला दशम्यांचा डबा तयार करून दिला.

अगदी निघायच्या काही वेळ आधी काका त्याला म्हणाले, ''मी आता पूजेला जातो. तुला निघायला अजून अवकाश आहे. जाताना प्रस्थान न्यायचं विसरू नकोस हं!''

जगन्नाथनं खाली वाकून काकांना नमस्कार केला. तेव्हा ते म्हणाले, ''आयुष्मान भव! कल्याणमस्तु!''

हे आशीर्वचन उच्चारल्यानंतर ते पुढे म्हणाले, ''हे पाहा, स्टॅण्डवर ना शामूला बरोबर घेऊन जा. बाकी तो अजून उठला नसलेच. तो पक्का सूर्यवंशी आहे. इतक्या लवकर कुठला उठणार!''

''माझं सामान काही फार नाही. जवळ तर जायचं आहे. जाईन एकटा!''

काका निघून गेले आणि जगन्नाथ एकटाच स्टॅण्डवर निघून गेला.

बसगाडी मारुतीच्या देवळासमोरच्या मैदानात येऊन थांबली, तेव्हा समोरच्या दिंडी दरवाजातून जान्हवी लगबगीनं बाहेर पडली. तिनं जगन्नाथकडे एक ओझरता दृष्टिक्षेप टाकला आणि ती बसमध्ये जाऊन बसली. जगन्नाथही बसमध्ये काही अंतरावर जाऊन बसला. कट्ट्यावर बसलेल्या लोकांचे तिरपे कटाक्ष त्यांच्यावर जाऊन पडले. कुणीच काही बोललं नाही, पण त्या लोकांचे कटाक्ष सर्वकाही बोलून गेले होते.

महाडपर्यंत गाडीत फारशी गर्दी नव्हती; परंतु महाडला बरेच प्रवासी गाडीत शिरले, तेव्हा जगन्नाथ सहजपणानं जान्हवीजवळ जाऊन बसला. तेव्हा जान्हवी पुटपुटली, ''आता आपला प्रवास सुखाचा होईल!''

जगन्नाथ हसून म्हणाला, ''आता गावकऱ्यांचे कटाक्ष आपल्या प्रेमावर पडणार नाहीत. प्रेमावरचं ग्रहण सुटलं... दे दान सुटे गिराण.''

असं म्हणून त्यानं तिच्याकडं काही एका अभिप्रायानं बघितलं. तेव्हा तिनं आपली तर्जनी वर करून त्याला दटावल्यासारखं केलं आणि म्हटलं, ''शू... हे बघ.... ग्रहण सुटलं असलं तरी इथे काही मिळणार नाही बरं का! हा आपल्या आजीचा बंगला थोडाच आहे! तिथे आजी सर्वकाही खपवून घेते म्हणूनच आपलं चालतं. इथे आपल्या गावात काल केवढं मोहोळ उठलं आहे, माहीत आहे ना?''

''म्हणून तर आपण सुट्टी संपायच्या आधीच पुण्याला जायला निघालो आहोत!''

''झालं तर मग! आता गप्प बस आणि जरा पलीकडे सरक! मला थोडं मोकळं बसू दे!''

महाड सोडून त्यांची बस बरीच पुढे गेली, तेव्हा त्यांची ही कुजबुज थांबली. शरीरस्पर्शाची कुजबुज मात्र पुणे येईपर्यंत चाललीच होती.

त्या वेळी त्र्यंबकगुरुजींच्या लेखणीची कागदावर कुजबुज सुरू झाली होती. ते आपल्या धाकट्या भावाला फिर्यादपत्र लिहीत होते –

*ती. बापूला अनेक उत्तम आशीर्वाद,*

*हे नेहमीप्रमाणे खुशालीचे पत्र नाही, तर बेचैनीचे पत्र आहे. हे पत्र वाचून तूही बेचैन होऊन जाशील. बेचैनी निर्माण करणारा असाच एक प्रसंग काल घडला. आपला जगन्नाथ आणि भोसल्यांची जान्हवी हे दोघे शंकर टेकडीवर फिरायला गेले होते. वळवाचा मोठा पाऊस अचानक कोसळला. फिरायला गेलेली सारी मंडळी भराभरा गावात परतली. जगन्नाथ-जान्हवी मात्र अंधार पडल्यानंतर हातात हात घालून टेकडीखाली उतरले. त्यामुळे उभ्या गावात एक बॉम्बगोळा पडला. त्यांचं चांगलंच सूत जमलेलं दिसतंय. पिढ्यान्‌पिढ्या शांतपणानं नांदणाऱ्या आपल्या गावाची झोप या प्रकारामुळे पार उडली आहे. आपल्या घराला तर भूकंपाचा प्रचंड धक्का बसला आहे. भोसल्यांच्या राजेशाही कुटुंबानं केव्हातरी आपल्या कुटुंबाला शंकराच्या पूजेअर्चेसाठी या गावात आणलं. त्यांच्या या अन्नावर आपल्या कित्येक पिढ्यांचा पिंड पोसला. एकप्रकारे भोसल्यांचे आपण आश्रित; शिवाय आपण भिन्न जातीचे! परस्परांचा सुयोग्य*

*मान राखून आपण आजवर वागलो आणि काल या शांत डोहात खडा पडला. आणि गावात खळबळ माजली. आता या बिकट प्रसंगानं भलतंच वळण घेतलं, तर केवढा अनर्थ कोसळणार आहे ! मी तर हतबुद्ध होऊन गेलो आहे. दिङ्मूढ झालो आहे. जगन्नाथ इथे राहिला असता तर मी त्याच्यासमोर थोडंफार तोंड उघडलं असतं; परंतु कालचा प्रसंग घडल्यानंतर तो आज सकाळीच पुण्याला निघून गेला. जान्हवीही त्याच्याबरोबरच पुण्याला निघून गेल्याचं समजलं. मी मात्र इथे बुचकळ्यात पडून राहिलो आहे- तुझ्या येण्याची वाट बघतो आहे. तू आलास म्हणजे काहीतरी करता येईल. लवकर ये.*

तुझा चिंताग्रस्त भाऊ
त्र्यंबक

हे पत्र लिहून पोस्टात टाकल्यानंतर काकांना काहीसं हायसं वाटलं. ढवळलेला डोह थोडा शांत झाला होता.


भोसल्यांच्या राजप्रासादावरून परत येताना त्यांचं मन एकदम भूतकाळात जाऊन दाखल झालं. कितीतरी घटनाचा चित्रपट त्यांच्या अंतःचक्षूसमोरून सरकू लागला.

दुपारच्या जेवणानंतर ते वामकुक्षी घेत पहुडले, तेव्हा निद्रेऐवजी या भूतकाळातील जागृत झालेल्या घटनांनीच त्यांची सोबत केली.

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब





## डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या
शिस्तबद्ध संस्कारात वाढलेल्या...
वाघालाही पाळीव प्राणी करणाऱ्या
धाडसी झुंजार महाराणींची जीवनगाथा.

**किंमत : ३१०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# राझ महाल




## नील नेथन


अनुवाद

## गौरी देशपांडे

ताजमहालाच्या सौंदर्याला नव्या रहस्याची
किनार... उत्कंठा आणि अद्भुताच्या
अनुभूतीत गुंतवणारं अफलातून कथानक...

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तकाच्या पानांतून




# बर्लिन गंगेला मिळाले

**भा. द. खेर**

*हिंदू धर्मातील तत्त्वज्ञानाकडे आकर्षिल्या गेलेल्या पाश्चात्त्य कुटुंबातील व्यक्तींचा जीवनसंघर्ष*

## अखेरीचा प्रारंभ

हैडलबर्गच्या त्या हमरस्त्यावरून हातात हात घालून चाललेलं ते नवदांपत्य त्या गल्लीच्या तोंडाशी आल्यावर एकदम थबकलं. त्यांचे हात विलग झाले. त्यांच्या गुजगोष्टी एकदम थांबल्या. त्या गोष्टी ऐकत असताना त्यांच्या तोंडावर चढलेला शृंगाराचा गहिरा गुलाबी रंग त्यांच्या तोंडावरून एकदम उतरला. त्या तरुणानं आपल्या डाव्या हातानं त्या तरुणीच्या पाठीवर थोपटल्यासारखं केलं आणि उजव्या हातानं त्या गल्लीतील एका घराकडे बोट दर्शवीत तो म्हणाला, ‘‘डोरा, ते पाहिलंस का घर? हो तेच! त्याच घरात घडली



बरं ही दुर्दैवी घटना. किती विचित्र! किती अनपेक्षित! हो, तेच घर यात शंका नाही. पाहून ठेव ते घर.''

त्या तरुणीचं लक्ष त्या घरावर स्थिर झालं.

हाउफ्ट श्ट्रास हा हैडलबर्गमधला हमरस्ता! हमरस्ता म्हटला तरी रहदारीला पुरा म्हणून कधी पडायचा नाही. नेकरपासून श्पेयरपर्यंत सरळसोट पसरलेला हा रस्ता म्हणजे शहराचं वैभव गणलं जाई. एखाद्या निरुंद नदीला अधूनमधून कालवे निघावेत, त्याप्रमाणे या हमरस्त्याला डाव्याउजव्या बाजूंनी अनेक आडवे रस्ते फुटले होते.

त्यामुळे उभ्या-आडव्या रस्त्यांचं जाळं तयार झालं होतं. जुन्या काळची ही जळमटं झटकून टाकण्यासाठीच की काय, सतराव्या शतकाच्या अखेरीस या शहरावर फ्रेंचांची धाड पडली आणि हे सारे रस्ते उद्‌ध्वस्त झाले. परंतु पुन्हा ते उभारले गेले ते थेट जुन्याच पद्धतीवर- कानामात्रेचा फरक न करता ज्याप्रमाणे बाबावाक्य प्रमाण मानलं जावं त्याप्रमाणे! जुना हमरस्ता सरळ रेषेत नव्हता; परंतु त्यातच जुन्या लोकांना दिमाख दिसत असे. हा जुना दिमाख नव्यानं उभा केला गेला. नवा रस्ता बांधला गेला तो थेट जुन्या पद्धतीवर! दगड-धोंड्यांचा मुळीच फरक न करता- एखादा अष्टवक्र माणूस दिसावा तसा तो हमरस्ता पुन्हा साकार झाला. जणू फ्रेंचांची धाड पडलीच नव्हती. मानवी जीवन हे मुळीच साचेबंद नाही, हे दर्शविण्यासाठीच की काय, हा हमरस्ता ओबडधोबड दगडांचा बनविण्यात आलेला होता. या रस्त्यावरून चालताना जीवनाचे चढउतार माणसाला समजावेत, असाच हेतू होता की काय, कुणास ठाऊक!

त्या तरुणीचं लक्ष ज्या घरावर स्थिर झालं होतं, ते घर या हमरस्त्यावरील एका आडव्या गल्लीत होतं. या निरुंद गल्लीतील रस्ताही चौखंड्यांचा होता. चालून चालून दगड गुळगुळीत झाले होते. दगडांवर काळा रंग रापला होता. संध्याकाळच्या वेळी या गल्लीतील समोरासमोरची घरं परस्परांच्या कपाळाला कपाळ लावून उभी आहेत, असा भास होत होता.

त्या गल्लीतील कडेच्या घरातून एकेक वस्तू बाहेर पडत होती. भांडीकुंडी, फर्निचर, रेडिओ, रेफ्रिजरेटर, फोनो, फोटोफ्रेम्स. हे सारं सामान बाहेर आणलं जात होतं. गल्लीतील काही मंडळी मदत करण्यात गुंतलेली दिसत होती आणि जी मंडळी मदत करीत नव्हती, ती खिन्न मुद्रा करून तो सारा प्रकार

बघण्यात गर्क झालेली होती.

एवढ्यात आठ-दहा माणसांनी एक भला मोठा छपरी पलंग बाहेर आणला. बाहेरच्या दारातून पलंग वेडावाकडा करून बाहेर आणावा लागत होता. त्या घरात जी वेडीवाकडी घटना घडली होती, तिचंच जणू ते निदर्शक होतं. तो पलंग पुरता बाहेर पडल्याचं दृश्य बघितल्यावर त्या गल्लीच्या तोंडाशी उभा असलेला तरुण आपल्या शेजारच्या त्या तरुणीला पुन्हा म्हणाला, ''याच पलंगानं गेल्या तीन पिढ्यांचा इतिहास पाहिला, सुखदुःखाचा; आणि आता याच पलंगानं याच घरात नुकतीच घडलेली ती दुर्दैवी घटना बघितली; आणि सारं घर रस्त्यावर काढल्यावर हा स्वतः आता रस्त्यावर आला आहे एखाद्या मूळपुरुषासारखा!''

काही काळ स्तब्धता नांदली.

एकदम त्या घराच्या पुढच्या दरवाजापाशी मध्यम वयाची एक स्त्री दिसली. तिच्याकडे बघून सभोवती उभ्या असलेल्या कित्येकांनी आपली तोंडं दोन्ही हातांनी झाकून घेतली. कित्येकांनी हुंदके दिले; ते बऱ्याच दूरवर ऐकू आले.

तो तरुण शेजारच्या तरुणीला घाबऱ्या घाबऱ्या म्हणाला, ''ती पहा एर्ना. दुर्दैवी बिचारी! या बाईला तू कधी बघितलं होतंस का?''

त्या तरुणीनं नकारार्थी मान हलवली. तेव्हा तो तरुण पुढे म्हणाला, ''बाकी तू कशी बघशील? आपलं लग्न होऊन हैलबर्नहून तू नुकतीच इथे आली आहेस. नाही तर या बिचाऱ्या एर्नाला न ओळखणारं माणूस अख्ख्या गावात आढळणार नाही. तुला काय माहीत...''

पण त्या तरुणाचं बोलणं अर्धवटच राहिलं. त्याचं लक्ष त्या घराच्या दाराशी उभ्या असलेल्या दुसऱ्या तरुणीकडे गेलं. त्या तरुणीविषयी डोरा काही विचारणार तोच त्या तरुणानं सांगायला सुरवात केली, ''डोरा, एर्नाच्या पलीकडे उभी असलेली ती तरुणी आहे ना, ती भारतीय तरुणी आहे बरं का! एर्ना ही जर्मन बाई आणि तिच्या शेजारची ती भारतीय तरुणी. कसा विचित्र योगायोग आहे पहा! म्हणजे दोन संस्कृतींचा त्या घरात संगम झाला म्हणेनास! पण त्याच संगमामुळे त्या घराचं सुख पार धुवून निघालं; आणि त्या दोघींना रस्त्यावर आणून सोडलं...होय, अक्षरशः रस्त्यावर!''

मग तो तरुण जणू स्वतःशीच बोलू लागला. म्हणाला, ''कुठे जर्मनी, कुठे भारत; इथली ही नेकर नदी आणि तिथली ती गंगा नदी! या दोन नद्यांचे

प्रवाह परस्परांत मिसळून गेले. त्यांच्या रूपानं जणू या दोन देशांच्या भिन्न संस्कृती काही काळ एक झाल्या, त्यांचे प्रवाह परस्परांत मिसळले आणि अखेरीस दुःखाच्या सागरात विलीन झाले.''

डोरा त्याच्या विचारमग्न मुखाकडे बघत होती. तो तरुण आपल्याच तंद्रीत बोलत होता. म्हणत होता, 'काय करणार आता या घरात राहून? याच घरानं तिला ही अवस्था आणली. काही वास्तूच अशा असल्या पाहिजेत. तिला आता या घरात राहणं कसं शक्य आहे! त्या घरात तिच्यासमक्ष घडलेला दुर्दैवी इतिहास तिला सहन थोडाच होणार आहे. अर्थात् घर सोडलं म्हणून त्या दुर्दैवी स्मृतींची भुतं तिला थोडीच सोडून जाणार आहेत! पण बदल झाला म्हणजे माणसाला थोडाफार विरंगुळा वाटतोच की!''

त्या तरुणाची तंद्री मध्येच भंग पावली. कारण डोरा त्याला विचारत होती, ''त्या दोन बायांचं काही नातं आहे?''


त्या तरुणानं उत्तर दिलं, ''आहे तर! अलीकडची जी प्रौढ बाई आहे, तिची ती पलीकडची तरुणी सून आहे!...हो सूनच! पण त्यातही एक दुर्भाग्य दडलेलं आहे. ती सून तर खरीच, पण त्या बाईचा मुलगा मेला आणि मग ही सून झाली. मुलाच्या मृत्यूनंतर सुनेचं नातं निर्माण झालं....आहे की नाही दैवदुर्विलास! या नात्यासाठी तिला केवढी किंमत द्यावी लागली! फार फार मोठी!''

काही तरी बोलायचं म्हणून डोरा म्हणाली, ''खरंच!''

''डोरा, तुला कल्पना नाही, पण या बाईचा एके काळी केवढा रुबाब होता! मोठी करारी बाई! तिच्या करारीपणाची मुद्रा साऱ्या घरावर मारलेली असे, पण संघर्षाशिवाय बिचारीच्या वाट्याला काही आलं नाही. तिच्या घरात भारतीय संस्कृतीनं प्रवेश केला. तिचं सारं घर त्या संस्कृतीनं व्यापलं. तिला ते कधीच रुचलं नाही, कधीच मानवलं नाही. तिचा सासरा, तिचा पती आणि काही अंशानं तिचा मुलगासुद्धा भारतीय संस्कृतीनं झपाटला गेला. ही मात्र बिचारी झगड झगड झगडली; आणि अखेरीस रस्त्यावर आली. भारतीय संस्कृतीच्या आहारी जाऊन त्या तिघांना स्वर्ग मिळाला किंवा नाही कुणास ठाऊक! पण ही मात्र आता नरकात पडली- आपल्या भारतीय सुनेला बरोबर घेऊन! या घराची कथा जितकी दुर्दैवी तितकीच ती अजब आहे, अद्भुत आहे- अगदी खरी न वाटावी इतकी! पण खोटं तरी कसं म्हणता येईल? सारं सारं अगदी समोर घडलं! छेः भलतंच, भयंकर!''

◆

पुस्तकाच्या पानांतून




# ॥ सेतुबंधन ॥

**भा. द. खेर**

*श्रीरामाच्या जीवनावरील आकर्षक, मनोरंजक, रसपूर्ण कादंबरी*

## बालकांड

मध्यरात्र व्हायला आली तरी कैकेयीच्या मंदिरातले दिवे जळत होते. मंचकाजवळच्या मृदू आसनावर कैकेयी एकटीच बसली होती. चिंतेनं तिची सुंदर गौर मुद्रा काळवंडली होती. तिनं केसात घातलेली फुलं मलूल झाली होती. रात्रीच्या नीरव शांततेमुळे तर तिचं मन आणखी उदास झालं होतं. दशरथराजा नेहमीच मृगयेला जायचा. पुष्कळ वेळा कैकेयीही त्याच्यासमवेत जायची; पण आज मात्र तो एकटाच गेला होता. संध्याकाळपर्यंत येतो असं सांगून गेला होता; पण संध्याकाळच काय, अर्धी रात्र उलटली तरी तो आला नव्हता; त्यामुळेच कैकेयी अस्वस्थ झाली



होती. राजा एकटाच अश्वारूढ होऊन वनात गेला होता; त्यामुळे तर तिला विशेष चिंता वाटत होती. नेहमीप्रमाणे राजा वेळेवर येईल अशी तिची कल्पना होती. त्याच्या स्वागताला सिद्ध होऊन ती एकटीच मंदिरात बसली होती; पण आता मात्र त्या एकान्ताचीच तिला भीती वाटू लागली होती. कौसल्येला किंवा सुमित्रेला संदेश पाठवावा तर जवळ सेवक कुणीच नव्हते.

कैकेयीच्या मनात आलं, आपणच उठावं आणि कौसल्येकडे जावं. अंगावरचं उबदार उत्तरीय अंगाभोवती लपेटत ती उठली आणि गवाक्षाजवळ गेली. समोरच कौसल्येच्या मंदिरात एक दीप जळत होता. कौसल्या जागीच आहे हे कैकेयीच्या लक्षात आलं. कौसल्येकडे जायच्या विचारानं ती सोपानाकडे वळली आणि सोपानाच्या द्वाराशी क्षणभर थबकली. दूरवरून अश्वाच्या टापांचा अस्पष्ट आवाज ऐकल्याचा भास तिला झाला. कानोसा घेत ती तिथेच उभी राहिली.

त्या अवस्थेत किती क्षण गेले तिला कळलंच नाही. अश्वाच्या टापांचा आवाज जवळजवळ येत होता; पण हा आवाज कैकेयीला वेगळाच वाटत होता. दशरथराजा मृगयेहून परत येताना अतिशय वेगानं येतो, हे तिला माहीत होतं. नगरीत परतताना राजाच्या वाहनाचा वेग प्रचंड असतो हे तिच्या परिचयाचं होतं; पण आज मात्र अश्वाचा वेग मंद वाटत होता. तिच्या मनाची अस्वस्थता त्यामुळे वाढलीच होती. सोपानाच्या वरच्या टोकावर ती द्वाराला धरून उभी राहिली होती. राजाच्या स्वागताला खाली जायची इच्छा मात्र होत नव्हती. मन उत्सुक होतं; पण उदासही होतं.

कैकेयी सोपानाच्या द्वाराशी उभी असतानाच सोपानाच्या खालच्या बाजूनं हाक आली, ‘‘कैकेयी, जागी आहेस ना?’’

कौसल्येच्या हाकेनं कैकेयी चमकली. वरूनच म्हणाली, ‘‘हो जागीच आहे. कौसल्ये, ये ना! महाराज आताच नगरीत आलेत. त्यांचीच वाट पाहातेस ना?’’

‘‘होय, त्यांचीच वाट पाहात होते. तुझ्या मंदिरात दिवे दिसले म्हणून म्हटलं...’’

‘‘अगं, मग ये ना.’’

दोघी सवती कैकेयीच्या मंदिरात मंचकावर बसल्या. कौसल्या म्हणाली, ‘‘आज सकाळपासून मन अस्वस्थ झालंय. दिवसभर मी ईशचिंतनातच वेळ

घालवला. सूर्यास्तानंतर तर मन अधिकच अस्वस्थ झालं; पण एक प्रकारचं समाधानही वाटू लागलं. त्या क्षणापासून सारखं वाटतंय की, काहीतरी अशुभ घडलंय. अशुभ घडलं तरी मग मनाला समाधान कसं वाटतंय?''

कैकेयी सहजपणानं उद्गारली, ''कदाचित अशुभ घडलं असेल आणि त्यातूनच भविष्यात शुभ घडायचं असेल.''

''अशुभातून शुभ कसं घडणार गं? तुझं काहीतरीच तत्त्वज्ञान... त्यातून महाराज मृगयेला गेलेले असताना तरी हे असलं तत्त्वज्ञान पटत नाही.''

''अगं, आता महाराज परत आलेत म्हटलं! त्यांच्या अश्वाचा आवाज मी ऐकलाय. येतीलच ते इतक्यात, तेव्हा महाराजांची चिंता करू नकोस.''

कैकेयी असं म्हणाली खरं; पण तिच्या स्वतःच्या मनाचा अस्वस्थपणाही कमी झालेला नव्हता. कौसल्या गप्प बसून राहिली तेव्हा कैकेयीच पुढे म्हणाली, ''महाराज सुखरूप आलेत हे पाहिलं की, हा अस्वस्थपणा संपेल.''

पण कैकेयीची कल्पना चुकीची ठरली. दशरथ सुखरूप परतला होता; पण तो स्वस्थ नव्हता. कैकेयीच्या मंदिरात कौसल्या दिसताच तो उद्गारला, ''तूही इथेच आहेस? बरंच झालं. सुमित्रेलाही बोलावून आण.''

सुमित्रेला आणण्यासाठी कैकेयी चटकन उठली. अजून दशरथ राजा उभाच होता. कौसल्येनं दिलेल्या आसनावर बसण्याऐवजी तो मंदिरात येरझारा घालू लागला. त्याची गंभीर मुद्रा पाहून कौसल्या अधिकच उदास झाली.

सुमित्रा आल्यावर राजा आसनावर विसावला आणि विचारमग्न झाला. कैकेयीनं शांततेचा भंग केला, ''महाराज, काय झालंय तुम्हाला? प्रकृती बरी नाही का?''

राजा उदासपणे हसला, ''इतकं सहन करूनही प्रकृती उत्तम राहिली हेच माझं दुःख आहे.''

तिन्ही राण्या एकमेकींकडे पाहू लागल्या; पण दशरथाचं त्यांच्याकडे लक्षच नव्हतं. तो स्वतःच्याच विचारात पुन्हा दंग झाला. थोड्या वेळानं सुमित्रा म्हणाली, ''महाराज, आपलं दुःख काय आहे हे कळलं तर थोडं कमी करता येईल.''

कौसल्या मध्येच म्हणाली, ''इक्ष्वाकु कुलातले राजे असे कधी दुःखी होत नाहीत. राज्यसंपदेवरसुद्धा पाणी सोडणारे राजे या कुळात झालेत...''

दशरथ उद्विग्नपणे उद्गारला, ''राज्यसंपदेवरच काय स्वतःच्या प्राणावरदेखील

पाणी सोडायची माझी सिद्धता आहे; पण कौसल्ये, माझ्या हातून जे घडलंय त्याला प्रायश्चित्त नाही... मानवहत्या घडलीय माझ्या हातून...''

तिघी अवाक् झाल्या. कौसल्येनं दुःखानं आपलं मुख उत्तरीयात झाकून घेतलं. सुमित्रेची कोमल काया दुःखावेगानं थरथरू लागली. कैकेयीची मुद्रा काळवंडली. दशरथ त्या तिघींकडे पाहात होता; पण त्याच्या नेत्रात प्राण उरला नव्हता.

कितीतरी वेळानं कैकेयीनं हळूच विचारलं, ''महाराज, पण हे घडलं तरी कसं? आपण हेतुतः कुणाला अकारण मारणं शक्य नाही.''

''हेतुतः मारणं शक्यच नाही; पण म्हणून प्रमादाचं स्वरूप सौम्य होत नाही. मानवाची हत्या हा काही सामान्य प्रमाद नव्हे... आणि तो कसा घडला यालाही काही महत्त्व नाही. घडला एवढं खरं... त्यासाठी न्यायशास्त्रानं जी शिक्षा सांगितलीय ती भोगलीच पाहिजे...''

दशरथाचे हे शब्द कानावर पडताच तिन्ही राण्या चमकल्या. कौसल्या म्हणाली, ''मी काही न्यायशास्त्राचा अभ्यास केलेला नाही तरी मला असं वाटतं, हेतुतः प्रमाद घडला नसेल तर...'

कैकेयीनं मध्येच सुचवलं, ''शिक्षा काय भोगायची ते वसिष्ठ महर्षींना विचारू; पण महाराज, हे घडलं तरी कसं?''

''मी मृगयेसाठी म्हणून शरयूतीरावर वनात गेलो. सकाळपासून मृगया मिळालीच नाही. सूर्यास्त होईपर्यंत मी एकटाच हिंडत राहिलो; पण एकही मारण्याजोगा प्राणी दिसला नाही. सूर्यास्त होऊन गेल्यावर परत यायला निघालो; पण मृगयेला गेल्यावर रिकाम्या हातांनी परत यायचं हे काही मनाला प्रशस्त वाटेना. इक्ष्वाकूंच्या कुलात सारे क्षत्रिय मृगयापटू म्हणून प्रसिद्ध आहेत. याच कुळात जन्मलेला मी... माझी तर विशेष ख्याती आहे. हा अजराजाचा पुत्र दशरथ शब्दवेधी आहे असं लोक म्हणतात. नुसत्या आवाजाच्या दिशेनं अचूक बाण सोडून मृगया करणारा मी- पण आज मला दिवसाउजेडी मृगया मिळाली नाही; त्यामुळे मी खिन्न झालो. मनाच्या या अवस्थेत तिथेच वनात एका अश्वत्थ वृक्षाखाली थांबलो.''

त्याच्या दृष्टीसमोरून तो वृक्षाखालचा देखावा हलत नव्हता. अंधार पडू लागल्यामुळे नीरव शांतता होती. पक्षी आपापल्या घरट्यात परतले होते. निशाचर प्राणी अद्याप बाहेर पडले नव्हते. मंद वायू वाहत होता; पण तो इतका

मंद होता की, वृक्षांची पानं जागच्या जागी किंचित हलत होती तेवढीच! पानांची सळसळ होत नव्हती. समोर शरयू संथपणे वाहत होती. तिच्या तरंगाचा मंद नाद तेवढा जाणवत होता. त्या शांत वातावरणात राजा दशरथ एकटाच अश्वत्थ वृक्षाखाली उभा होता. त्यानं मनाशी निर्धार केला, 'आता इथेच थांबायचं. उत्तररात्री एखादा गज किंवा सिंह या शरयूवर पाणी प्यायला येईल. निदान एखादा मृग तरी निश्चित येईल. मग त्याच्या आवाजाच्या रोखानं बाण सोडता येईल आणि मृगया मिळाल्याच्या आनंदात अयोध्येला परत जाता येईल.'

त्याला जास्त वेळ थांबावं लागलं नाही. तो तिथे बसल्यानंतर थोड्याच वेळात शरयूच्या दुसऱ्या तीरावरून कसलासा आवाज आला. कान देऊन तो ऐकू लागला. गड्ऽऽगड् असा स्पष्ट शब्द ऐकू येत होता. एखादा मदोन्मत्त हत्ती मनसोक्त क्रीडा करून नदीवर पाणी प्यायला आला असावा असं राजाला वाटलं. त्यानं धनुष्य सरसावलं आणि तो बाण सोडायच्या पवित्र्यात उभा राहिला. हत्ती पाणी पिऊन परत जायला निघाला की, त्याच्यावर बाण सोडावा असं त्यानं मनाशी ठरवलं. तहानलेल्या प्राण्याचं समाधान झाल्याशिवाय त्याला टिपणं योग्य नव्हतं म्हणून तो काही क्षण तसाच थांबला.

गड्ऽऽगड् असा आवाज थांबला आणि पाण्यात काहीतरी खळबळल्याचा आवाज झाला. हत्तीनं सोंडेनं पाणी हलवलं असावं हे त्यानं मनाशी जाणलं. म्हणजे आता क्षणातच हत्ती परत जायला निघणार हे त्याच्या ध्यानात आलं. तो नेमका क्षण राजाला साधायचा होता. आवाजाची दिशा त्याच्या कानांनी अचूक जाणली होती. क्षणार्धात त्यानं त्या दिशेनं बाण सोडला. वेगानं बाण पलीकडच्या तीरावर गेला आणि त्यानं अचूक *लक्ष्यवेध* केला. काहीतरी धडपडल्याचा, कोसळल्याचा आवाज ऐकू आला आणि त्याच क्षणी एक चीत्कार वनात घुमला. कानांचे पडदे फाडत तो चीत्कार राजाच्या मनात घुसला. अजाणता का होईना; पण आपण केवढा प्रमाद केलाय हे त्या क्षणीच त्याला कळलं. कारण तो चीत्कार हत्तीचा नव्हता... तर तो होता माणसाचा!

हे लक्षात आल्याबरोबर राजा दशरथाच्या शरीरात त्राण उरलं नाही. त्याच्या हातातलं धनुष्य गळून पडलं. भीतीनं तोंडाला कोरड पडली. रात्रीची शीतल वेळ असूनही सारा देह घामाघूम झाला. हातापायांना कंप सुटला. समोरच्या तीरावर आपला बाण लागून पडलेल्या त्या माणसाकडे त्वरित जायला हवं हे

त्याच्या मनाला जाणवत होतं; पण इच्छा असूनही पाय मात्र उचलता येत नव्हता. तो तिथेच त्या अश्वत्थाखाली खिळल्यासारखा उभा राहिला.

इतक्यात समोरच्या तीरावरून विव्हल स्वरातले शब्द त्याच्या कानांवर आले, ''का रे बाबा मला मारलंस? मी तुझा असा कोणता अपराध केला होता?''

आता मात्र राजा दशरथाला स्वस्थ बसणं शक्य नव्हतं. तो त्वरेनं पलीकडच्या तीरावर गेला आणि काही क्षणांतच त्या विद्ध माणसाजवळ पोहोचला.

हा वृत्तान्त ऐकल्यावर कैकेयीनं विचारलं, ''कोण होता तो? मानवी आवाजात बोलणारा एखादा वनचर प्राणी की निशाचर राक्षस?''

''छे, छे! वनचर प्राणी किंवा राक्षस नव्हता... कैकेयी, तो माणूस होता. तपस्वी होता... तपश्चर्येनं त्याची काया कृश झाली असली तरी तो तेजःपुंज होता. माझ्या बाणाचं शल्य त्याला टोचत होतं. त्या दुःखानं तो विव्हल झाला होता. वेदनांमुळे त्याची मुद्रा विकृत झाली होती. तरीही त्याचं तेज लोपलं नव्हतं. त्याच्या केसांच्या जटा अस्ताव्यस्त झाल्या होत्या. त्यानं भरून घेतलेला जलकलश सांडल्यानं तिथे चिखल झाला होता. तिथेच तो कोसळून पडला होता. लवंडलेला कलश हातात धरून दुःखावेगानं तो लोळत होता; त्यामुळे त्याचं अंग चिखलानं माखलं होतं. त्याची ती अवस्था पाहून मी घाबरलो. अस्वस्थ झालो. माझी चाहूल लागताच त्यानं नेत्र उघडून माझ्याकडे पाहिलं. त्याचं तेज मला सहन होईना. त्याची दृष्टी चुकवत मी हात जोडून म्हटलं, ''महाराज, मी अयोध्येचा राजा दशरथ... अजराजाचा पुत्र...''

तो तापस मंद स्वरात उत्तरला, ''मला माहीत आहे. मी ओळखलं तुला! तू इक्ष्वाकु कुलातला शब्दवेधी राजा आहेस, होय ना? पण राजा माझा वेध का घेतलास तू? मी पित्यासाठी पाणी न्यायला इथे आलो होतो. तुझा कोणता अपराध मी केला होता, राजा?''

राजाला काही बोलताच येत नव्हतं. तो नुसताच हात जोडून चिखलात बसून राहिला.

वेदनांनी तापसी तळमळत होता. मध्येच तो म्हणाला, ''माझे वृद्ध माता-पिता अंध आहेत. ते तहानेनं व्याकुळ झालेत म्हणून मी पाणी न्यायला आलो, हाच ना माझा अपराध? राजा, तुझ्या राज्यात तृषितांना पाणी देणं हा अपराध

आहे का रे? की अंध माता-पित्यांची सेवा करणं हा अपराध आहे? पुत्रानं पित्यासाठी हे केलंच पाहिजे असं धर्मात सांगितलंय ना? मग तू मला ही शिक्षा का दिलीस? कुणाचा त्रास नको म्हणून मी इथे वनात येऊन राहिलो. माझा कुणाला काही त्रास होत नाही. वन्य आहारावर आम्ही जगतो, हा माझा अपराध आहे का? मग मला ही शिक्षा का दिलीस? राजा, सांग ना... सांग की... तू असा गप्प का?''

दशरथ रडतरडत म्हणाला, ''क्षमा करा तपस्वी. मी मृगयेसाठी आलो होतो... अंधारात आपण कलश जलानं भरत होता. त्याचा आवाज ऐकला आणि-''

''बाण सोडलास. होय ना? तुझी चांगली मृगया झाली. पण-''

''नाही, नाही; असं म्हणू नका. मी हेतुतः तुम्हाला मारलं नाही; मला वाटलं, रात्रीच्या वेळी एखादा हत्ती नदीवर पाणी प्यायला आला असेल... त्याच्या पाणी पिण्याचा गड्ऽऽगड् असा आवाज होत असेल, असं वाटून मी आवाजाच्या रोखानं बाण सोडला. आपण इथे राहाता हे मला माहीत नव्हतं. इतक्या निर्जन वनात रात्रीच्या वेळी कुणी मानव पाणी भरायला येईल अशी कल्पनाही मनात आली नाही.''

वेदनांनी तळमळणारा तो तपस्वी चिखलातच लोळत होता. हे पाहून राजा उठला. त्यानं अलगद त्या तपस्व्याला उचललं आणि कोरड्या भूमीवर मृदू तृणांकुरावर झोपवलं. तेवढ्या हालचालीनंही तपस्व्याला श्रम झाले आणि त्याला किंचित ग्लानी आली. दशरथानं आपलं उत्तरीय भिजवून आणलं आणि त्या तपस्व्याच्या मुखावरून ते फिरवलं. तपस्व्यानं डोळे उघडले. मंद आवाजात तो म्हणाला, ''राजा, तू एकच बाण मारलास खरा! पण त्या एका बाणानं तीन प्राण्यांची मृगया केलीस. मी तर आता जगत नाहीच; पण माझे वृद्ध माता-पिता तरी माझ्या मागे कसे जिवंत राहतील?''

राजा उत्तरला, ''त्यांची आपण चिंता करू नका. मी त्यांना अयोध्येला नेईन. त्यांची सेवा करीन. स्वतः त्यांची शुश्रूषा करीन. पापाचं प्रायश्चित्त घेतल्याचं थोडं तरी समाधान मला मिळेल.''

तपस्वी खिन्नपणे हसला, ''तुला समाधान मिळेल; पण त्या वृद्ध जीवांचं समाधान कसं होणार?''

यावर दशरथ काहीच बोलला नव्हता. काही क्षणांनंतर तो तपस्वीच

म्हणाला होता, ''राजा, माझे माता-पिता तिकडे आश्रमात माझी वाट पाहात असतील. तहानेनं ते व्याकुळ झाले असतील. मला हाका मारत असतील. मी इथे विद्ध होऊन पडलोय हे त्यांना माहीत असणं शक्य नाही. माझ्या शोधासाठी ते आश्रमाबाहेर पडू शकणार नाहीत. तेव्हा राजा तू एक कार्य कर.''

''काय करू सांगा, आत्ता करतो.'' दशरथ तत्परतेनं म्हणाला, ''तुमच्या माता-पित्यांना इथे आणू का?''

''नको, नको. माझ्या वेदना त्यांना सहन होणार नाहीत. त्यांना इथे आणून उपयोग काय? त्यापेक्षा तूच जाऊन त्यांना सारा वृत्तान्त कथन कर. या वाटेनं सरळ गेलास की त्यांचा आश्रम दिसेल.''

दशरथ हलकेच उठला. तेव्हा तो तपस्वी म्हणाला, ''राजा, माझे माता-पिता वृद्ध आहेत. अंध व पंगू आहेत. अनाथ आहेत; पण तू त्यांचा अपराधी आहेस, तेव्हा ते तुला शाप देतील. कदाचित त्यांच्या क्रोधानं तू दग्ध होशील...''

दशरथाची काया थरथरली. तो काहीच बोलला नाही. तपस्वीच म्हणाला, ''तेव्हा राजा, त्या वृद्धाला आधी पाणी दे. प्रसन्न करून घे आणि मगच हा सारा वृत्तान्त सांग. म्हणजे त्यांना राग आला तरी तो सौम्य असेल... आता तू जा; पण थांब... जाण्यापूर्वी माझ्या देहातला हा तुझा बाण काढून टाक. तुझा हा बाण मला पीडा देतोय...''

राजा थबकला. तपस्व्याच्या देहात घुसलेल्या बाणाचं शल्य त्याला पीडा देत होतं; त्यामुळे त्याला असह्य वेदना होत होत्या; पण तो बाण शरीरात घुसून बसला होता म्हणूनच तो जिवंत राहिला होता. बाण काढला की, त्याचं प्राणोत्क्रमण होणार होतं. रक्तस्राव थांबवायला आणि वेदना शमवायला राजाजवळ औषध नव्हतं. तपस्व्यानं त्याही अवस्थेत त्याची द्विधा मनःस्थिती जाणली.

तो म्हणाला, ''राजा, काहीही केलंस तरी माझा मृत्यू अटळ आहे. बाण काढलास तर मी त्वरित प्राण सोडेन. बाण काढला नाहीस तर वेदनांनी तळमळत प्राण सोडेन. या यातनांतून मला मुक्त करणं तुझ्या हातात आहे.''

तपस्व्याचं ते निर्वाणीचं बोलणं ऐकून दशरथ अस्वस्थ झाला; पण त्या तपस्व्याला यातनामुक्त करावं असा विचार त्यानं केला. तो त्याच्या अगदी जवळ गेला आणि त्याच्या देहात घुसलेल्या बाणाला त्यानं हात लावला. त्याच

क्षणी त्याची दृष्टी तपस्व्याच्या मुखाकडे गेली. तपानं तळपणारी आणि जटाभारानं झाकलेली तेजस्वी सावळी मुद्रा पाहून तो चमकला. 'हा तपस्वी ब्राह्मण तर नव्हे? मनुष्यहत्येचं पातक मोठं; पण ब्रह्महत्येचं पातक तर सर्वात मोठं... अरेरे! काय घडलं हे माझ्या हातून!'

राजाच्या मनातले विचार त्या तपस्व्यानं ओळखले. वेदनांचं दुःख आवरत तो म्हणाला, ''राजा, तू चिंता करू नकोस. ब्रह्महत्येचं पातक तुला लागणार नाही; कारण मी ब्राह्मण नाही. माझा पिता वैश्य आहे आणि माझी माता शूद्र आहे... तेव्हा तुला ब्रह्महत्येचं पातक लागणार नाही. तू निःशंकपणे हा बाण काढून टाक.''

मग राजानं हलकेच त्या तपस्व्याच्या शरीरातला बाण उपसून काढला. तपस्व्यानं एक क्षण राजाकडे पाहिलं आणि नेत्र मिटून घेतले. ते व्याकुळ झालेले नेत्र पुन्हा उघडतील म्हणून राजा काही क्षण तिथेच थांबला; पण तपस्व्याची हालचाल पूर्णपणे थंडावली होती. जड अंतःकरणानं राजा उठला आणि त्या तपस्व्याचा कलश पाण्यानं भरून आश्रमाकडे जायला निघाला.

''मला चालवत नव्हतं, तरी मी तसाच आश्रमात गेलो. मनात दुःख आणि भीती दाटली होती. तरी त्या तपस्व्याच्या सांगण्याप्रमाणे वृत्तान्त सांगायलाच हवा होता. मी हळूच जाऊन आश्रमाच्या दारात उभा राहिलो. ते वृद्ध पति-पत्नी आपल्या पुत्राची आतुरतेनं वाट बघत होते. तहानेनं कासावीस झालेले ते अंध जीव पुत्राच्या चिंतेनं अधिकच व्याकुळ झाले होते. शोकामुळे माझ्या हातातला अर्धवट भरलेला जलकुंभ किंचित हलला; तेव्हा त्यातल्या पाण्याचा आवाज त्यांच्या कानी पडला. त्या वृद्धांनी चमकून माझ्याकडे पाहिलं आणि हातातलं जलपात्र पुढे केलं. मी चटकन पुढे होऊन त्यांच्या पात्रात पाणी घातलं. दोन घोट पाणी प्यायल्यावर वृद्ध पिता म्हणाला, ''पुत्रा, तू इतका वेळ का लावलास रे? आम्ही दोघे इथे वाट बघत होतो. तू शरयूमध्ये क्रीडा करत बसलास की काय? तुझी ही माता चिंतेनं व्याकुळ झाली; पण तू असा भलत्या वेळी क्रीडेत मग्न होणारा नव्हेस. मग तू इतका वेळ कुठे गेला होतास? आमच्यावर रागावलास होय?''

हे बोलणं ऐकल्यावर राजा गोंधळून गेला. काहीच न बोलता तो उभा राहिला तेव्हा तो वृद्ध पुन्हा म्हणाला, ''अरे, बाळा, असं रागावू नये. कशासाठी रागावलास ते तरी सांग? अरे, वृद्धांचं काही चुकलं तर तुझ्यासारख्या

तपस्व्यानं ते मनात ठेवू नये. आम्ही वृद्ध, पंगू शिवाय अंध... तुझ्यावाचून आम्हाला कुणाचा रे आधार आहे? तू म्हणजे आमचे बहिश्चर प्राण... तूच असा रागावतोस? पुत्रा, बोल की रे... तू *तात* म्हटलं नाहीस तर''

''तात... क्षमा करा.''

''क्षमा कशाबद्दल? आणि तुझा आवाज वेगळा का येतोय? काय झालंय सांग... मी तुला क्षमा करीन; पण खरं काय ते सांग.''

''तात, मी तुमचा पुत्र नव्हे. मी दशरथ, इक्ष्वाकु कुलातल्या अजराजाचा पुत्र-''

''अयोध्येचा राजा होय? अरे तू कशाला पाणी आणलंस? आमचा तो तपस्वी पुत्र कुठे गेला?... आणि हे काय? तू रडतोस कशासाठी? सांग सांग... काय घडलंय ते सांग...''

मग राजानं धीर करून सारा वृत्तान्त सांगितला आणि अखेरीस तो म्हणाला, ''मुनिवर्य, अजाणता का होईना पण माझ्या हातून तुमच्या पुत्राचा वध झालाय; आता आपण आज्ञा करा.''

त्या वृद्धानं आपलं मुख झाकून हुंदके द्यायला सुरुवात केली. त्याच्या वृद्ध पत्नीनं तर 'श्रावणाऽऽ' म्हणून हंबरडा फोडला. तिची ती करुण हाक रात्रीच्या शांततेचा भंग करत रानावनांत घुमली. तिचा विलाप ऐकून राजाचं दुःखही शतगुणित झालं. मग तो त्या वृद्धाजवळ बसला आणि त्याचे पाय धरत म्हणाला, ''तात, मी तुमचा शतशः अपराधी आहे. मला आपण जी शिक्षा द्याल-''

''राजा, ही वार्ता तू स्वतःच येऊन सांगितलीस हे उत्तम केलंस.'' त्या वृद्धानं आपलं दुःख आवरत म्हटलं, ''नाही तर तुझ्या मस्तकाचे तुकडे तुकडे झाले असते. हे कृत्य तू समजूनउमजून केलं असतंस तर तू जिवंत राहिला नसतास. अरे, माता-पित्यांच्या सेवेची तपश्चर्या करणारा माझा पुत्र म्हणजे ऋषीच होता. त्याला मारण्याचं पातक प्रत्यक्ष इंद्राच्या हातून घडलं तरी माझ्या कोपामुळे तो स्थानभ्रष्ट झाला असता; पण राजा, तू हे कृत्य अज्ञानानं केलंस म्हणून मी तुला क्षमा करतो.''

दशरथ अजूनही त्या वृद्धाचे पाय धरून अश्रुमोचन करत होता. तो वृद्ध अधूनमधून पुत्राच्या आठवणी काढत होता आणि रडत होता. त्याची पत्नी दुःखावेगाने केवळ विलाप करत होती. बराच वेळ गेल्यावर वृद्ध म्हणाला,

''राजा, आम्हाला आमच्या पुत्राजवळ ने.''

राजा चटकन उठला. त्यानं वृद्धाला पाठीवर बसवलं आणि त्याच्या पत्नीचा हात धरून तो तिच्यासह हळूहळू चालू लागला. शरयू नदीच्या तीरावर तो तपस्वी जिथे पडला होता तिथे तिघेही पोहोचले तेव्हा मध्यरात्र व्हायला थोडाच अवधी उरला होता. राजानं दोघाही वृद्धांना त्यांच्या पुत्राच्या जवळ बसवलं. दोघांनीही हातांनी चाचपडत आपल्या पुत्राला कवटाळलं. रक्तानं माखलेल्या त्याच्या देहावरून हात फिरवताना ती वृद्ध माता पुन्हा शोक करू लागली. तिचा पती रडतरडत तिची समजूत घालू लागला, ''अगं, रडू नकोस. आपल्या बाळाला उत्तम गती प्राप्त झाली आणि आपण तरी आता त्याच्या मागे इथे राहाणार थोडेच आहोत? आपणही त्याच्या मागोमाग जाऊच की. आपल्या पुत्राला सद्‌गती मिळाली. त्याचा वध करणाऱ्याला मात्र सद्‌गती लाभणार नाही.''

हे शब्द ऐकल्यावर राजा दचकला. त्याला शोकावेग आवरेना. त्याच्या रडण्याचा आवाज ऐकल्यावर तो वृद्ध म्हणाला, ''राजा, ती माझ्या मुलाला मारलंस! आता मलाही मारून टाक... पण नको. तू मारण्याची आवश्यकता नाही. मी आता जिवंत राहाणारच नाही... पण राजा ऐक...''

राजा भीतीनं थरथर कापू लागला. तो वृद्ध तपस्वी आपल्याला शाप दिल्यावाचून राहाणार नाही, हे त्यानं ओळखलं. त्यानं काहीतरी बोलायचा प्रयत्न केला; पण त्याच्या तोंडून शब्द फुटेना.

अस्पष्ट स्वरात वृद्ध म्हणाला, ''तू अज्ञानानं माझ्या मुलाला मारलंस म्हणून ब्रह्महत्येचं पातक तुला लागणार नाही; पण मला तू पुत्रशोक दिलास म्हणून तूही माझ्यासारखा पुत्रशोकानं मरशील-''

दशरथानं सांगितलेला तो भयानक वृत्तान्त ऐकून त्याच्या तिन्ही राण्या एकदम सुन्न होऊन गेल्या. कुणालाच काही बोलायला सुचत नव्हतं. सगळा वृत्तान्त सांगून टाकल्यावर राजाचं मन थोडं हलकं झालं; पण राण्यांची म्लान मुद्रा पाहून त्याला पुन्हा दुःखाचा उमाळा आला. तो रडत म्हणाला, ''आता जन्मभर तपस्वीहत्येचं आणि शापाचं ओझं बाळगून जगायचं! त्यापेक्षा चटकन मरण आलं तर पत्करलं; पण मरण तरी असं थोडंच येणार? म्हणून मी ठरवलंय की...''

तिघींनीही राजाकडे चमकून पाहिलं. राजा आसनावरून उठत म्हणाला,

''मी ठरवलंय की, आता वनात जायचं. वानप्रस्थ स्वीकारून तप करायचं. तरच-''

''मीही तुमच्याबरोबर येणार.'' कौसल्या चटकन म्हणाली.

सुमित्रेनं दुजोरा दिला, ''मीसुद्धा येणार.''

कैकेयी मात्र म्हणाली, ''मी मात्र येणार नाही आणि तुम्हालाही जाऊ देणार नाही. कुणीच वानप्रस्थात जायचं नाही.''

''मग काय इथेच सुखविलासात राहून शापाच्या ओझ्याखाली वावरायचं? मला ते जमणार नाही.''

''ऐकून तरी घ्या महाराज... शाप भयानक आहे हे खरं; पण तुम्हाला वाटतो तितका दुःसह नाही.''

कौसल्या, सुमित्रा आणि दशरथही आश्चर्यानं तिच्याकडे पाहू लागले. ती पुढे म्हणाली, ''तो वृद्ध पिता काय म्हणाला? तुम्हालाही पुत्रशोकानं मरण येईल, होय ना? मग पुत्रशोक होण्यासाठी तरी तुम्हाला इथेच राहायला हवं.''

राजानं विचारलं, ''म्हणजे?''

''म्हणजे असं की, त्या शोकाकुल पित्यानं एक गुप्त वरदानच दिलंय की... तुम्हाला पुत्रशोक होणार म्हणजे पुत्रही होणार, असंच की नाही?''

त्याही अवस्थेत राजाच्या मुखावर एक स्मितरेषा उमटली. कौसल्या आणि सुमित्राही सावरून बसल्या. कैकेयी पुढे म्हणाली, ''म्हणजे इतकी वर्षं आपण पुत्रप्राप्तीविना दुःखात काढली. सारी सुखं असून पुत्र नाही म्हणून आपण तळमळत राहिलो. आता ते दुःख तरी संपेल, अशी आशा निर्माण झाली आहे. कारण त्या वृद्ध पित्याचा शाप खराच ठरणार आणि त्यासाठी पुत्र होणार...''

दशरथ म्हणाला, ''किती चतुर आहेस गं? शापाचा हा चांगला भाग माझ्या लक्षातच आला नव्हता. आता हा वृत्तान्त वसिष्ठ महर्षींच्या कानावर घालतो आणि ते सांगतील तसे उपाय योजतो. प्रायश्चित्तासाठी आणि पुत्रप्राप्तीसाठीही यज्ञ करता येतात का हे पाहायला सांगतो.''

राजा चटकन उठून मंदिराबाहेर गेला. सूर्योदय व्हायची वेळ झाली होती. उषःकालच्या त्या रम्य प्रहराचाही राजाच्या मनावर परिणाम झाला. मनातलं शापाचं दुःख बाजूला ठेवून तो उल्हासानं वसिष्ठांकडे जायला निघाला.

◆

पुस्तकाच्या पानांतून




# सुखाचा लपंडाव

**भा. द. खेर**

*स्वातंत्र्यपूर्व काळाच्या पार्श्वभूमीवर प्रेमाच्या त्रिकोणातून साकारलेले हृदयस्पर्शी भावनाट्य*

स्टेशनवर गाडी थांबताच पुष्पमाला जागी झाली. तिनं अंगावर घेतलेली चादर बाजूला करून कोणतं स्टेशन आलं हे बघण्यासाठी बाहेर नजर टाकली. बाहेर तिच्या दृष्टीला सारा अंधार दिसला. वर आकाशात काळ्याकुट्ट मेघांची नुसती गर्दी झाली होती आणि पाऊस पडण्यास नुकताच प्रारंभ झाला होता; त्यामुळे स्टेशनवर फारशी वर्दळ दिसत नव्हती. तिच्या शेजारच्या डब्यातून तिकिटाशिवाय प्रवास करणारं एक भिकाऱ्याचं जोडपं तिकीट तपासनिसानं शिव्या देऊन डब्याबाहेर हाकलून दिलं. त्या नवरा-बायकोचे केविलवाणे चेहरे डब्यातून येणाऱ्या प्रकाशात पुष्पमालेला स्पष्ट दिसले. त्या स्त्रीच्या कडेवर असलेलं लहान मूल पाऊस लागताच मोठ्यांदा रडू लागलं आणि त्या रडण्याच्या आवाजात दूर कोठेतरी रडणाऱ्या कुत्र्याचा आवाज मिसळताच



पुष्पमालेला तो आवाज अशुभ वाटला आणि त्या योगानं त्या अंधाराची भीषणता तिला अधिकच भासली. नाही म्हणायला स्टेशनच्या आवारातला एक दिवा तिच्या दृष्टिपथात येण्याजोगा होता. त्या दिव्याच्या काचेवर कदाचित स्टेशनचं नाव लिहिलेलं असेल अशा समजुतीनं तिनं आपली दृष्टी अधिक विस्तृत करून त्या दिव्याकडे बघितलं; पण तिला ते तेथे लिहिलेलं आढळलं नाही. मग तिनं तो प्रयत्न सोडून दिला आणि खिडकीतून आपलं डोकं आत घेऊन ते पुन्हा उशीवर टेकलं. इतक्यात ''पाटस स्टेशन आहे, पाटस!'' असा पोर्टरनं केलेला गंभीर आवाज तिला ऐकू आला; म्हणजे पुणे स्टेशन येण्यास अजून बराच अवधी आहे, तोपर्यंत आपली आणखी एक झोप सहज होईल या विचारानं पायाशी असलेली चादर तिनं गळ्यापर्यंत ओढून घेतली आणि डोळे मिटले. थोड्याच वेळात गाडी पुन्हा सुरू झाली. त्या वेळी आपल्या तोंडावर पावसाचे तुषार येत आहेत असं वाटून तिनं आपलं तोंड खिडकीच्या विरुद्ध दिशेला वळवलं. त्याबरोबर तिला समोरच्याच बाकावर एक माणूस बसलेला दिसला. तो दृष्टीस पडताच त्याच्याकडे तिनं चमकून बघितलं आणि थोड्याच वेळात तिची खात्री पटली की, या माणसाला आपण नगरच्या स्टेशनवर बघितलं होतं. लगेच त्या वेळेचा प्रसंग तिला आठवला. भाऊ तिला नगरच्या स्टेशनवर पोहोचवण्यासाठी आले होते. वास्तविक ते पुण्यापर्यंत तिच्या सोबत येणार होते; परंतु त्या दिवशी दुपारी तिला पुण्यापर्यंत पोहोचवण्याचा विषय निघताच ती म्हणाली होती, ''भाऊ, मला लहान मुलगी का समजता? नगरपासून पुण्यापर्यंत प्रवास करणं अवघड का आहे? या सोबतीपायी किती पैसा खर्च होतो याचा विचारच तुम्ही करत नाही.''

त्यावर भाऊ म्हणाले होते, ''पैशाचाच प्रश्न असेल तर मग मी तुझ्याबरोबर पुण्याला येतोच.''

भाऊंच्यासमोर पैशाचा प्रश्न येऊ नये इतकी त्यांची सांपत्तिक परिस्थिती उत्तम होती अशातला भाग नव्हता. कारण पुष्पमालेपेक्षा दोन वडील बहिणींच्या शिक्षणाचा आणि लग्नाचा खर्च त्यांनी केला होता. पुष्पमालेचीही कॉलेजच्या शिक्षणाची दोन वर्षं झाली होती; त्याशिवाय पुष्पमालेचे दोन लहान भाऊ हायस्कूलमध्ये शिकत होते आणि शिक्षण खात्यात नोकरी करणाऱ्या माणसाला आपला मोठा घरखर्च चालवून शिल्लक टाकण्याजोगा असा कितीसा पैसा मिळणार? तथापि योग्य तो खर्च करण्यास भाऊंनी कधीही मागेपुढे बघितलं

नव्हतं आणि म्हणूनच पुष्पमालेला पुण्यापर्यंत सोबतीकरता म्हणून जाण्यासाठी लागणारा खर्च करण्याची त्यांची तयारी होती, याची पुष्पमालेला अर्थात जाणीव होती आणि म्हणूनच भाऊंनी वरीलप्रमाणे पैशाचा मुद्दा बाजूला सारताच ती म्हणाली होती, ''पैशांची गोष्ट बाजूला राहू दे; परंतु स्त्रिया एकट्यानं प्रवास करण्याइतक्या तरी स्वसंरक्षणक्षम झाल्या पाहिजेत असं तुम्हाला नाही वाटत?''

तिची विचारसरणी पटली म्हणून नव्हे तर तरुण माणसांना त्यांच्या चुका नुसत्या तोंडानं दर्शवून देण्यापेक्षा त्यांनाच स्वानुभवानं त्या कळलेल्या बऱ्या या मताचे भाऊ असल्यामुळे त्यांनी त्या बाबतीत तिच्याशी फारशी हुज्जत घातली नव्हती आणि तिला एकटीलाच पुण्याला पाठवण्याचं ठरवलं होतं. निदान तिनं रात्रीच्या तरी गाडीनं जाऊ नये असं त्यांचं मत होतं; परंतु काही मैत्रिणींकडे दुपारी फराळाला जायचं असल्यामुळे तिला दुपारच्या गाडीनं निघता आलं नव्हतं आणि तिला तर रात्री निघणं आवश्यकच होतं, कारण दुसऱ्या दिवशी तिच्या कॉलेजात कोणातरी बड्या गृहस्थाचं कॉलेज सुरू होण्याच्या निमित्तानं भाषण होणार होतं. त्यांच्या हस्ते हुशार विद्यार्थ्यांना बक्षिसं वाटली जाणार होती. पुष्पमालेला यंदाचं तर्कशास्त्रातलं पहिलं बक्षीस मिळणार असल्यामुळे तिला पहिल्याच दिवशी कॉलेजमध्ये हजर राहायला हवं होतं. साहजिकच रात्रीच्या गाडीनं निघण्याशिवाय तिला गत्यंतर नसल्यामुळे भाऊंना तिचा निघण्याचा कार्यक्रम बदलता आला नव्हता. तिला झोपून जाता यावं म्हणून त्यांनी मुद्दाम तिला दुसऱ्या वर्गाचं तिकीट काढून दिलं होतं. डब्यात बसल्यानंतर ते तिला म्हणाले होते, ''अगं, निदान गळ्यातली साखळी आणि हातातल्या बांगड्या तरी ट्रंकेत काढून ठेवायच्या होत्यास!''

यावर तिनं हसून उत्तर दिलं होतं, ''आपल्या जवळ भीतीचं कारण नसताना स्वसंरक्षण करण्यात काहीच अर्थ नाही. उलट, हे असलं भीतीचं मूळ जवळ ठेवून मगच स्वसंरक्षण करण्यात एक प्रकारची गंमत आहे.''

त्यावर भाऊ थोडेसे हसले खरे; परंतु त्यांच्या मनात मात्र तिच्या प्रवासाच्या सुरक्षिततेबद्दल काळजी वाटल्यावाचून राहिली नव्हती. जेव्हा त्यांच्यात हा संवाद चालला होता, तेव्हा आता आपल्यासमोर बसलेला हाच माणूस आपल्याजवळ उभा होता आणि त्या वेळी त्यानं आपल्याकडे अगदी न्याहाळून बघितलं होतं याची पुष्पमालेला आठवण झाली; परंतु गाडी सुटण्याची वेळ येताच तो माणूस जवळच्याच डब्यात शिरला होता. मग तिचं लक्ष तिकडे गेलं

नव्हतं; कारण भाऊ तिला पुनःपुन्हा म्हणत होते, ''सुखरूप पोहोचल्याचं पत्र पाठव बरं का, म्हणजे मला काळजी वाटणार नाही.''

आणि त्याच वेळी तिच्या डब्यात घाईघाईनं एक युरोपियन स्त्री मोठ्या कुत्र्याला घेऊन चढली होती. त्या कुत्र्याकडे बोट करून तिनं हसून म्हटलं होतं, ''भाऊ, तुम्ही आता मुळीच काळजी करू नका. हा कुत्रा नक्की माझं संरक्षण करेल.''

मग गाडी सुरू झाल्यावर त्या युरोपियन स्त्रीशी मुद्दामहून ओळख काढून तिच्याशी बोलताना तिच्याकडे न्याहाळून बघणाऱ्या माणसाबद्दल तिच्या मनात एकही विचार आला नव्हता. त्याच स्त्रीशी ती मनसोक्त बोलत सुटली; इतकं की, त्या युरोपियन स्त्रीलासुद्धा तिच्या त्या बोलक्या स्वभावाचं बरंच आश्चर्य वाटलं आणि तिनं ते लगेच व्यक्तदेखील केलं. ती पुष्पमालेला इंग्रजीत म्हणाली होती, ''तुमच्यासारख्या हिंदी स्त्रिया परकीय स्त्रीशी इतक्या मनमोकळेपणानं बोलत असतील याची मला कल्पना नव्हती.''

यावर पुष्पमालेनं हसून उत्तर दिलं होतं, ''मग माझ्यावरून तुमचा हिंदी स्त्रियांविषयी झालेला चुकीचा ग्रह बदलला असेल नाही? निदान बदलायला हवा आणि तसा तो बदलला असेल तर माझ्या हातून देशाची काहीतरी कामगिरी झाली असं मानायला मला काहीच हरकत नाही.''

हे ऐकून स्त्रीनं हसून म्हटलं होतं, ''बरं तर! तुमच्या उदाहरणावरून देशाची कामगिरी करण्याची एवढी संधी तुम्हाला देण्यात मला खचित आनंद वाटेल.''

असं म्हणून त्या स्त्रीनं इतक्या बेतानं हास्य केलं होतं की, न जाणो त्यापेक्षा जर आपण अधिक हास्य केलं, तर कदाचित आपल्या ओठांना लावलेला तांबडा रंग खराब होईल अशी भीती तिला वाटली असावी.

बोलण्याच्या ओघात पुष्पमालेनं त्या स्त्रीची बरीच माहिती काढली होती. तिचं नाव मिस कॅथेराइन कॉकरेल असं होतं. तिचा प्रियकर कमिशन घेऊन नुकताच लढाईवर गेला होता. त्यांच्या प्रेमाची परस्परांना नुकतीच ओळख झालेली होती आणि अशा स्थितीतही केवळ आपल्या मायदेशासाठी लढाईवर जायला तिनं त्याला आनंदानं संमती दिली होती. ही गोष्ट पुष्पमालेला सांगताना तिचं अंतःकरण केवढ्या मोठ्या अभिमानानं फुलून गेलं होतं! आम्ही युरोपियन स्त्रिया आपल्या मायदेशासाठी आपल्या पवित्र प्रेमालाही तिलांजली देण्यास

मागेपुढे बघत नाही, हाच अभिमान त्या आंग्ल युवतीच्या गौरवर्ण मुखावर प्रतीत झाला होता. शेवटी ती म्हणाली होती, ''आपली आठवण म्हणून माझ्या प्रियकरानं मला त्याचा हा आवडता जॉन कुत्रा भेट म्हणून दिला. या कुत्र्यावर माझं किती प्रेम आहे म्हणून सांगू! कारण तो माझ्या लाडक्या जेम्सनं मला दिला आहे.''

असं म्हणून मोठ्या प्रेमभरानं त्या कुत्र्याला कुरवाळून तिनं त्याच्या कपाळाचं चुंबन घेतलं होतं. त्यासरशी तिला आपल्या लाडक्या जेम्सची आठवण होऊन तिचे निळे डोळे पाण्याने भरून आले होते. ते दृश्य बघून पुष्पमालेचं अंतःकरणदेखील कंपायमान झालं आणि मग तिच्याशी फारसं संभाषण न करता तिनं आपलं डोकं उशीवर टेकलं. ती मनाशी म्हणाली होती, 'आपल्यालाही आयुष्यात आपल्या प्रियकराला असाच निरोप देण्याचा प्रसंग येणार नाही काय? आणि त्या वेळी आपली काय स्थिती होईल?'

त्या वेळी भवितव्यानं तिला असं खचित उत्तर दिलं असतं, 'हो! तुझ्याही आयुष्यात पुढे असाच एक प्रसंग येणार आहे आणि त्या वेळी –'

पण छे! भविष्यकाळात होणाऱ्या गोष्टींचा विचार आताच काय म्हणून करायचा? ...पुष्पमालेला तरी त्या उत्तराचा काहीच उपयोग होणार नव्हता. नंतर त्या स्त्रीबद्दलच्या विचारातच तिला केव्हा झोप लागली हे तिलादेखील कळलं नव्हतं.

आणि आता 'पाटस' स्टेशन येताच ती जेव्हा जागी झाली तेव्हा तिनं तर्क केला की, ती स्त्री मागेच दौंड स्टेशनवर उतरून गेली असली पाहिजे. या वेळी तिच्या डब्यात तिच्यासमोर तो माणूस बसला होता आणि पलीकडच्या वरच्या बर्थवर एक व्यक्ती आपलं पांघरूण डोक्यावर लपेटून पडली होती. नगरपासून जरी ती व्यक्ती त्या डब्यात होती तरी पुष्पमालेला त्या व्यक्तीचा चेहरा दिसला नव्हता. समोर बसलेल्या त्या माणसाकडे बघून मात्र तिला थोडीशी भीती वाटल्यावाचून राहिली नाही, कारण सुरमा घातलेले त्याचे डोळे आपल्याकडेच न्याहाळून बघत आहेत अशी तिची खात्री झाली. मनातून जरी ती काहीशी घाबरली तरी तिनं वरवर धैर्याचा आव आणला आणि आपली चादर डोक्यावर ओढून घेऊन डोळे मिटले. थोड्याच वेळात तिचा डोळा लागला; परंतु काही वेळानं ती दचकून जागी झाली, त्या वेळी तिला डब्यात सगळीकडे अंधार दिसला आणि आपला हात कोणीतरी घट्ट दाबून धरल्याचा तिला भास झाला.

तो भास किंवा सत्य हे बघण्यासाठी तिने ओरडून विचारलं, ''कोण आहे?''

यावर हसण्याचा आवाज येऊन विनोदगर्भ असं उत्तर आलं, ''मी कोण माहीत नाही? आमची जात जगप्रसिद्ध आहे. माझं नाव गुंड!''


असं म्हणून आपण जणू काय खूप मोठा विनोद केल्याच्या भावनेनं ती व्यक्ती खदखदून हसली. गाडी भरवेगात चालली होती. डब्यात अगदी अंधूक प्रकाश होता. त्या प्रकाशातदेखील पुष्पमालेला त्याचे सुरमा घातलेले डोळे आणि डोक्यावरची त्याची तुर्की टोपी या गोष्टी स्पष्ट दिसल्या. डब्यात आपल्याशिवाय कोणी नाही या हिशेबानं त्या व्यक्तीनं अशी वाक्यं उच्चारली असावीत, कारण पुढे लगेच त्यानं म्हटलं, ''तुमच्या मदतीला कोणी धावून येईल ही अपेक्षा व्यर्थ आहे, कारण डब्यात तुमच्या-माझ्याशिवाय दुसरं कोणीच नाही. तेव्हा ओरडण्यात काहीच अर्थ नाही.''

असं म्हणून त्या माणसानं पुष्पमालेच्या बांगडीला हात घातला. त्या वेळी ती इतकी घाबरली की, खूप मोठ्यांदा ओरडण्याची तिला मनस्वी इच्छा होऊनदेखील तिला तसं करता आलं नाही. अखेर तिची बांगडी काढताना त्या गुंडानं तिच्या हाताला इतक्या जोरदार हिसका मारला की, त्याबरोबर तिच्या तोंडावाटे आपोआपच एक अस्फुट किंकाळी बाहेर पडली.

एखाद्या रजतपटावरून एखादं दृश्य सरकून लगेच त्या ठिकाणी दुसरं दृश्य यावं त्याप्रमाणे पुष्पमालेला त्या वेळी क्षणाच्या अवधीतच एक चमत्कार दिसून आला. डब्यातला अंधार जणू काही जादूनंच एकदम नाहीसा झाला आणि दिव्याच्या प्रकाशात एक निराळंच दृश्य तिच्या दृष्टोत्पत्तीस आलं. वरच्या बर्थवर निजलेल्या व्यक्तीनं तिची किंकाळी ऐकून दिव्याचं बटन ओढलं आणि त्या प्रकाशात खरा प्रकार कळताच वरून एकदम त्या इसमाच्या पाठीवर उडी मारून त्याचा गळा दाबला होता. नंतर काही काळ त्या दोघांची बरीच झटापट झाली. शेवटी गुंडानं आपला सुरा बाहेर काढला; पण लगेच त्या तरुणानं चपळाईनं त्याच्या सुरा असलेल्या हातावर जोरानं ठोसा मारला. त्याबरोबर त्याच्या हातातून तो सुरा निसटला आणि पुष्पमालेच्या मनगटाला चाटून तो खाली पडला. त्या सुऱ्याच्या वारासरशी तिच्या हातातून भळाभळा रक्त वाहू लागलं आणि ते दृश्य सहन न होऊन तिनं ''आई गं!'' असा अस्फुट उद्गार काढला आणि लगेच ती मूर्च्छित पडली.

◆

## कृष्णदेवराय




मी आजपर्यंत शिवाजी महाराजांच्या कालखंडापासून पुढच्या इतिहासाच्या आधारावर बेतलेल्या कादंबऱ्या वाचल्या आहेत. यामध्ये शिवाजी सावंत, रणजित देसाई, ना. स. इनामदार, विश्वास पाटील या लेखकांची नावे प्रामुख्याने समोर येतात; परंतु ज्या हिंदू साम्राज्याकडे जिजाऊ आणि शिवरायदेखील प्रेरणास्थान म्हणून पाहत, त्या विजयनगर साम्राज्याचे सम्राट कृष्णदेवराय यांच्यावरील लेखन काही गवसत नव्हते. नुकतेच लक्ष्मीनारायण बोल्ली यांचे पुस्तक समोर आले आणि भारताच्या हिंदू साम्राज्याच्या देदीप्यमान इतिहासाचा मानबिंदू असणारा काळ डोळ्यांसमोर उभा राहिला.

ऐतिहासिक कादंबरी लिहायची असेल तर मुख्यत: त्यातून लढाया, राजकारण, कूटनीती, कट कारस्थाने या नाट्यमय घडामोडींवर भर देण्याचा मोह लेखकाला आवरत नाही; कारण वाचकाला खिळवून ठेवण्याची क्षमता अशा घटनांमध्ये असते; परंतु एखाद्या सम्राटाने लढाया करून राज्यविस्तार केल्यानंतर त्या राज्यात सुव्यवस्था, विद्याश्रय, कलाश्रय या गोष्टी कशा फुलवल्या हे त्याचे सर्वांत महत्त्वाचे कर्तृत्व असते. आणि मला या पुस्तकातली सर्वांत भावलेली गोष्ट हीच! या पुस्तकातील खूपसा भाग कृष्णदेवराय यांचा काव्य, कला याचा व्यासंग, त्यांचा कुटुंबातील वावर, राज्यव्यवस्थेची नीती या भागासाठी समर्पित केला



आहे. कृष्णदेवराय यांनी लिहिलेल्या 'अमूल्यमाल्यदा' ग्रंथाचे वर्णन तर अतिशय रसाळ शब्दांत केले आहे. त्या काळातील इतर कवींची माहिती आणि वैशिष्ट्ये विविध संवादांतून अलगद उतरवली आहेत. लेखकाची भाषाच इतकी मृदू आहे की आपण त्यात गुंतत जातो. अलंकृत संवाद आणि आजची बोली भाषा याचा सुरेख मेळ घालून अधिक प्रभावी केलेले आहेत.

ऐतिहासिक कादंबरीमध्ये शृंगारिक प्रसंग मांडणे म्हणजे लेखनातील नाजूक भाग! अशावेळी शब्दांना लगाम लावावा लागत असला, तरीही त्यात नाजूक बेफामता असावी लागते. योग्य शब्दांत आले तर ते गोड होते; परंतु वाहवत गेले तर हिरमोडही होऊ शकतो. लेखकाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील शृंगारिक प्रसंग इतक्या नाजूक पावलांनी येतात, की ते वावगे न वाटता खूप गोड वाटतात.

त्यातील लढाई, राजकारण या प्रसंगांतून नाट्यमयता येत राहिल्याने कथेचा प्रवाहही अखंडित राहतो. कृष्णदेवराय यांच्याव्यतिरिक्त येणारी महत्त्वाची पात्रे महाअमात्य तिम्मरसु, राणी चिण्णादेवी, साम्राज्ञी तिरुमालादेवी, तेनाली रामकृष्ण ही पात्रेदेखील ठसठशीतपणे मांडली आहेत. कादंबरीमध्ये प्रत्येक पात्राला न्याय्य अवकाश मिळत जातो. आजपर्यंत जितके काही वाचनात होते, त्यातून तेनालीराम यांचे पात्र फक्त हजरजबाबी, विनोदी इतकेच माहीत होते; परंतु तेदेखील एक महान कवी होते, हे या कादंबरीमुळे माहीत झाले.

इतिहासातील पात्रांची आताच्या वाचकांच्या मनातील प्रतिमा घडवण्याची किंवा बिघडवण्याची ताकद अशा कादंबरीमध्ये असते. बऱ्याच वेळा एखाद्या व्यक्तिमत्त्वामुळे भारावले गेल्याने त्यांचे चरित्र पूर्वग्रहाने मांडले जाते; परंतु लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी, कृष्णदेवराय संदर्भांमधून जसे दिसले तसेच मांडले आहेत. सम्राटाची महानता जरी प्रामुख्याने दिसत असली तरी जिथे बोट ठेवण्याची गरज आहे तिथे तटस्थपणे असे प्रसंगदेखील ते मांडतात. मला वाटतं, दृष्टिकोनातील तटस्थपणा हेच या कादंबरीचे मोठे शक्तिस्थान आहे.

काळाच्या आड गेलेले हे इतिहासातील झळकते पान म्हणजेच कृष्णदेवराय! नक्कीच वाचावे असे.

**– विशाल पोतदार**

◆

## १६ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२३ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते २८ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत**

**१६ फेब्रुवारी - एकहार्ट टोले यांचा जन्मदिन**

'अवनी एक नवी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१७ फेब्रुवारी - अविनाश लोंढे यांचा जन्मदिन**

'बेधुंद' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१७ फेब्रुवारी - सदानंद कदम यांचा जन्मदिन**

'सांगाती' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७७/-**

---

**१८ फेब्रुवारी - तेहमिना दुर्रानी यांचा जन्मदिन**

'ब्लास्फेमी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**१८ फेब्रुवारी -लिसा सी यांचा जन्मदिन**

'शांघायच्या मुली', 'ड्रीम्स ऑफ जॉय' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११२५/- । सवलत किंमत ८४५/-**

---

**१९ फेब्रुवारी - छ. शिवाजी महाराज जयंती**

'जाणता राजा श्री शिवछत्रपती', 'श्रीमान योगी', 'लक्ष्यवेध', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?', 'शिवछत्रपती : एक मागोवा', 'महासम्राट-झंझावात' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १९५०/- । सवलत किंमत १३६५/-**

---

**२० फेब्रुवारी - टोनी विल्सन यांचा जन्मदिन**

'शॅपेल'(मराठी) या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १३९/-**

**२० फेब्रुवारी - पीअर बाऊल यांचा जन्मदिन**

'द ब्रिज ऑन द रिव्हर क्वाय' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १५४/-**

**२१ फेब्रुवारी - प्रा. डॉ. कैलास सार्वेकर यांचा जन्मदिन**

'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १७९/-**

**२४ फेब्रुवारी - डॉ. सुचित तांबोळी यांचा जन्मदिन**

'मुलांच्या समृद्ध जीवनासाठी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १६९/-**

**२४ फेब्रुवारी - छ. राजाराम महाराज जयंती**

'शिवपुत्र राजाराम' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३८७/-**

**२५ फेब्रुवारी - डॉ. आ. बा. पाटील यांचा जन्मदिन**

'बोन्साय', 'घरातील बाग', 'शेती करू फायद्याची', 'सुंदर आपली फुलबाग', 'सुंदर आपली फळबाग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०००/- । सवलत किंमत ६००/-**

**२५ फेब्रुवारी - डॉ. आशिष बोरकर यांचा जन्मदिन**

'स्थूलतेला करा टाटा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

**२७ फेब्रुवारी - मराठी राजभाषा दिन**

रु. ३०००च्या खरेदीवर ४० टक्के सवलत

**२८ फेब्रुवारी - राष्ट्रीय विज्ञान दिन**

**संच १**-'A TO Z विज्ञान', 'वैज्ञानिक खेळणी', 'छंदातून विज्ञान', 'साधी यंत्रे', 'विज्ञानातील रंजकता', 'विज्ञानातील गमतीजमती', 'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'प्रेमाचा रेणू', 'अंतराळातील मृत्यू', 'अश्मजीव', 'संकरित', 'डिंभक', 'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर', 'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'अज्ञाताचे विज्ञान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २४०५/- । सवलत किंमत १५६३/-**

**संच २**-'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-१', 'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-२', 'असे घडले सहस्रक', 'प्रयोग वनस्पती विज्ञानाचे', 'अंतरिक्षाचा वेध','विज्ञानातील सरस आणि सुरस', 'नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी', 'फक्त खेळण्यांसाठी', 'खेळणीच खेळणी', 'खेळणी विज्ञानाची', 'विज्ञान गमती', 'विज्ञान जमती', 'चला, प्रयोग करू या!' (३ पुस्तकांचा सेट), 'इ.स. २५९५' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २४६५/- । सवलत किंमत १६०२/-**

**संच ३** - 'गार्डिअन', 'जॉर्ज अॅन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स', 'रोबॉट फिक्सिंग', 'स्वप्नचौर्य', 'असे शास्त्रज्ञ, असे संशोधन', 'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान', 'आपल्या पूर्वजांचे विज्ञान', 'कथारूपी खगोलशास्त्र', 'शास्त्रज्ञांचे जग', 'अशक्य भौतिकी', 'नाते ब्रह्मांडाचे', भिंतींना जिभाही असतात', 'प्लँटोन, 'खुजाबा', 'जॉर्ज अॅन्ड द ब्ल्यू मून', 'जॉर्ज अॅन्ड द शिप ऑफ टाइम', 'जॉर्ज अॅन्ड द अनब्रेकेबल कोड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६४६५/- । सवलत किंमत ४२०२/-**

---

**२८ फेब्रुवारी - स्टीव्ह मार्टिनी यांचा जन्मदिन**

'क्रिटिकल मास', 'द अॅटर्नी', 'द सिमीऑन चेंबर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०८०/- । सवलत किंमत ६४९/-**

---

**खालील संचांवर १ ते १५ मार्च दरम्यान खास सवलत**

**१ मार्च - पांडुरंग कुंभार यांचा जन्मदिन**

'उधाण' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

---

**४ मार्च - प्रिया कुमार यांचा जन्मदिन**

'परवाना जगण्याचा', 'प्रतिरूप' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४४५/- । सवलत किंमत २९९/-**

**४ मार्च - खालिद हुसैनी यांचा जन्मदिन**

'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स', 'अँड द माउंटन्स एकोड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११५५/- । सवलत किंमत ७५०/-**

**४ मार्च - दिप्ती जोशी यांचा जन्मदिन**

'नि:शब्दाचे मौन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ८९/-**

**७ मार्च - पिअर्स पॉल रीड यांचा जन्मदिन**

'अलाइव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत १०९/-**

**७ मार्च - ई. एल. जेम्स यांचा जन्मदिन**

'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे', 'फिफ्टी शेड्स डार्कर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३४९/-**

**८ मार्च - रश्मी बन्सल यांचा जन्मदिन**

'अराइज, अवेक', 'स्वप्नांचे इंद्रधनू...', 'टेक मी होम', 'कनेक्ट द डॉट्स', 'आय हॅव अ ड्रीम', 'शाइन ब्राइट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १९८०/- । सवलत किंमत १२८७/-**

**८ मार्च - महिलादिन**

'रुपेरी 'सिंधू', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'कर्मयोगिनी', 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल भाग २', 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल : भाग ३', 'नोबेल ललना - भाग १' , 'नोबेल ललना - भाग २', 'स्वप्नाकडून सत्याकडे...(कल्पना चावलाची कहाणी)', 'अंतराळवीर सुनीता विल्यम्स', 'अ‍ॅज आय सी... भारतीय पोलीस सेवा...', 'अ‍ॅज आय सी... नेतृत्व आणि प्रशासन...', 'अ‍ॅज आय सी... स्त्रियांचे सक्षमीकरण...', `Be The Change... भ्रष्टाचाराशी लढा', 'आय डेअर', 'इट्स ऑलवेज पॉसिबल', 'मजल... दरमजल...', 'व्हॉट वेंट रॉंग अँड व्हाय', 'दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल', 'जाणती राणी महाराणी ताराबाई', 'कृष्णसखी राजराणी मीराबाई', 'ममतेची मूर्ती मदर तेरेसा', 'रणरागिणी दुर्गाराणी', 'सती साध्वी देवी अहिल्या', 'बंधमुक्त होताना...', 'ब्रह्मकन्या', 'माय डॉटर माय मदर', 'नेतृत्व निर्मिती', 'निर्भय प्रशासन', करवीर छ. इंदुमती राणीसाहेब' या

पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६७६०/- । सवलत किंमत ४२६०/-**

**१२ मार्च - यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिन**

'वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध', 'पहिली फेरी?', 'साहेब संध्याकाळी भेटले..' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६६५/- । सवलत किंमत ३४९/-**

**१४ मार्च - शेवडे गुरुजी यांचा जन्मदिन**

शेवडे गुरुजी लिखित २१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१७०/- । सवलत किंमत १४५४/-**

**१४ मार्च - जॉन लेन यांचा जन्मदिन**

'THE ART OF AGEING' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

◆

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**

**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा**

या ईमेलवर पाठवा. **author@mehtapublishinghouse.com**









धडाकेबाज व्यक्तिमत्त्वाचे आत्मचरित्र

**'डॅम इट आणि बरंच काही'**

याचे थाटात प्रकाशन

**डॉ. किरण बेदी** यांचा उपस्थितांशी दिलखुलास संवाद



'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023

RNI. No. MAHMAR/2000/02739

Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.

Publication Date : 11/02/2023 Posting Date : 11/02/2023




## बेस्ट सेलर्स

**मेहता मराठी ग्रंथजगत**

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,

टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,